दैनिक

# जय महाभारत

संपादक : विजयकुमार वाव्हळ

www.dainikmahabharat.com ● RNI No. MAHMAR/2015/64418 ● jaymahabharat2015@gmail.com

महाराष्ट्र ● बीड (महाराष्ट्र) ● दैनिक ● मराठी | वर्ष ११ वे ● अंक १७ ● मंगळवार दि.०२ सप्टेंबर २०२५ ● किंमत २ रू. ● पाने ४

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक




# आंदोलकांसमोर मनपा हतबल

## प्रशासनाची दमछाक; हजारो कर्मचारी फिल्डवर

मुंबई : प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. आजपासून त्यांनी पाणीही पिणार नसल्याचे सांगितले आहे. राज्य सरकारसोबतच्या चर्चा यशस्वी होत नसल्याने हे आंदोलन लांबत चालले आहे. आंदोलन लांबल्याने आंदोलकांची प्रचंड गैरसोय होऊ लागली आहे. पाऊस असल्याने सोबत आणलेले कपडे, गाद्या हे साहित्य भिजले आहे.

ज्याप्रमाणे आंदोलकांची गैरसोय होत आहे, त्याचप्रमाणे मुंबईकरांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यातील सर्वात मोठी अडचण आहे ती म्हणजे कच–याची. आंदोलन स्थळी आझाद मैदान ते सीएसटी परिसरासह मुंबईत अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. ३ दिवसांपासून कच–याने भयानक रूप धारण केले आहे.

मुंबई महापालिकेने आंदोलन स्थळ, आझाद मैदान, सीएसटी परिसरात स्वच्छतेसाठी तीन शिफ्टमध्ये सुमारे १२०० कर्मचारी फिल्डवर उतरवले आहेत. ही स्वच्छता करताना महापालिकेची चांगलीच दमछाक होताना दिसत आहे. अशा या आंदोलनाला महापालिका पहिल्यांदाच सामोरे जात आहे. आम्ही स्वच्छता करताना हतबल ठरत आहोत, अशी एका अधिका–याने प्रतिक्रिया दिली.



गेल्या ३दिवसांत महापालिकेच्या स्वच्छता विभागाने २२ मेट्रिक टन कचरा उचलला आहे. आंदोलनादरम्यान, सुमारे ३० मेट्रिक टनापेक्षा अधिक कचरा निघण्याची शक्यता अधिका–यांनी वर्तवली. या साफसफाईसाठी ३ दिवसांपासून ३ शिफ्टमध्ये १२०० कर्मचारी फिल्डवर उतरवले आहेत. कर्मचा–यांच्या गणेशोत्सवातील सुट्ट्या रद्द करून फिल्डवर उतरवण्यात आले आहे.

वाहतूक सुरळीत करताना वाहतूक पोलिसांचीही चांगलीच दमछाक होत आहे. लाखो आंदोलकांची हजारो वाहने एकाचवेळी मुंबईत धडकल्याने वाहतूक व्यवस्थेची पहिल्याच फटक्यात विकेट पडली. इतक्या मोठ्या प्रमाणात आंदोलक आणि वाहने शहरात धडकू शकतात, याचा अंदाज सरकारला नव्हता. त्यामुळे २९ ऑगस्टलाच वाहतुकीचे १२ वाजले होते.

त्यादिवशी हाताबाहेर गेलेली परिस्थिती अजूनपर्यंत नियंत्रणात आलेली नाही. आझाद मैदान, सीएसएमटी, बीएमसी, चर्चगेट, मंत्रालय या भागात मोठ्या प्रमाणात आंदोलक रस्त्यावर उतरल्याने मोठी वाहतूक कोंडी आहे. मुंबईच्या एन्ट्री पॉईंट्सवरही वाहतूक कोंडी कायम आहे. मुंबईतील वाहतूक कोंडीची धास्ती घेऊन आतापर्यंत ८० हजार वाहनांनी यु–टर्न घेतला आहे.

मध्य रेल्वेचे मुख्यालय व जागतिक वारसास्थळात समावेश असलेल्या सीएसएमटी स्थानकालाही मराठा आरक्षण आंदोलनाचा फटका बसला आहे. कार्यकर्ते दिवसभर आझाद मैदानावर असतात आणि रात्री विश्रांतीसाठी सीएसएमटी स्थानकावर आश्रय घेतात. दररोज हजारो आंदोलक मुक्काम करीत असल्यामुळे रेल्वे प्रशासनावर प्रचंड ताण येत असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.



### अफगाणिस्तान भूकंपात

## ८०० हून अधिक जणांचा मृत्यू

### ३ हजारहून अधिक जखमी, 'दर ५ मिनिटांनी रुग्ण होतोय दाखल'

पूर्व अफगाणिस्तानमध्ये, पाकिस्तानच्या सीमेजवळ असलेल्या भागात ६.० रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला असून मोठे नुकसान झाले आहे.

या भूकंपात ८०० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे तालिबान सरकारने सांगितले आहे. तर, ३००० हून अधिक जखमी झाल्याची माहिती आहे.जास्त मृत्यू हे अफगाणिस्तानातील कुनार प्रांतातील आहेत. हा अतिशय दुर्गम आणि डोंगराळ प्रदेश आहे.

भूकंपामुळे या भागातील माती आणि दगडांनी बनलेली घरे कोसळली, भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. जखमींना ढिगाऱ्यातून बाहेर काढून हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षितस्थळी हलविण्यात येत असून बेपत्ता नागरिकांचा शोध सुरु आहे.

## आंदोलनाची धग वाढणार; मनोज जरांगे आजपासून पाणी पिणेही बंद करणार; एकतर विजययात्रा, नाहीतर अंत्ययात्रा

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलनाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षण मिळाल्यानंतरच मुंबई सोडणार, असा ठाम पवित्रा घेतला आहे. शनिवारी मराठा आंदोलक आणि राज्य सरकारची बाजू मांडणाऱ्या शिंदे समिती यांच्यातील बोलणी फिस्कटल्यानंतर रविवारी आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी सरकारकडून कुणीही चर्चेसाठी आले नाही. त्यामुळे जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला असून सोमवारपासून मी पाण्याचा एकही थेंब घेणार नाही, अशी घोषणा केली आहे. त्यामुळे आजपासून आंदोलनाची धग आणखीन वाढली जाणार आहे.

सरकार मागण्या मान्य करत नाही, हे आमच्या लक्षात येत आहे. त्यामुळे सोमवारपासून मी पाणीसुद्धा बंद करणार आणि कडक उपोषण सुरू करणार. तसेच मराठा आंदोलकांनी कुणावरही दगडफेक करू नये. मराठा समाजाच्या एकाही पोराने दगडफेक करायची नाही, समाजाला मान खाली घालावी लागेल, असे एकही पाऊल कोणी उचलायचे नाही. सगळ्यांनी शांत राहायचे. त्यांना आपल्यावर कितीही अन्याय, अत्याचार करू द्या. मला तुमच्याकडून शांतता पाहिजे. मी तुम्हाला आरक्षण देणार, त्याशिवाय मुंबई सोडणार नाही. अन्नछत्र आणि रेनकोटच्या नावाने कुणी पैसे उकळत असेल तर तसे करू नका. असे जरांगे पाटील यांनी आंदोलकांना खडसावले.



सुप्रिया सुळे यांच्या गाडीवर हल्ला केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांना झापले. सन्मान दिला नाही तर नेते आंदोलनस्थळी यायला घाबरतील. सन्मानाने येऊ द्या आणि सन्मानाने पाठवा, ही जबाबदारी तुमच्यावर आहे. इथून एकतर विजयी यात्रा निघेल नाहीतर माझी अंत्ययात्रा निघेल, असेही जरांगे म्हणाले.

मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीवर जरांगे म्हणाले की, सुप्रीम कोर्टाचा सरसकटला विरोध असण्याचे कारण नाही. पण कोर्टात अडचण असेल तर मराठा कुणबी ही उपजात आहे, असे करा सरसकट म्हणू नका. २०१२ च्या कायद्यानुसार मराठा आणि कुणबी पोटजात म्हणून घ्या, सरसकट म्हणायची गरज नाही. सरकारला आता एकही कागदपत्र देणार नाही. कारण सरकारने १३ महिन्यांपूर्वी हैदराबाद गॅझेटकडून कागदपत्रे घेतले आहे. सातारा गॅझेट आहे. तसेच मराठवाड्यातला मराठा हा कुणबी आहे हे सिद्ध झाले आहे. राज्य मागासवर्ग आयोगाकडून ते घेणे गरजेचे आहे. आम्हाला ओबीसी आरक्षणात जाण्यापासून कोणीच थांबवू शकत नाही. आम्ही ओबीसीमध्ये जाणार म्हणजे जाणार.दरम्यान, गणपतीच्या दर्शनासाठी आपल्या दरे गावी गेलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तातडीने मुंबईला रवाना झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीसुद्धा मुंबईकडे कूच केली आहे.


## संपूर्ण आठवडाभर पाऊस देशात घालणार धुमाकूळ

### गुरूग्रामला ऑरेंट अलर्ट तर मुंबईतही मांडणार ठिय्या

यावेळी मुसळधार पाऊस पडत आहे. संपूर्ण ऑगस्ट महिना पावसात गेला. आता सप्टेंबरमध्येही पाऊस थांबत नाहीये. या संपूर्ण आठवड्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे, कुठे घातक ठरणार जाणून घ्या

ऑगस्ट हा मान्सून हंगामातील सर्वात जास्त पाऊस पडणारा महिना असतो, ज्यामध्ये सरासरी २२६.८ मिमी पाऊस पडतो. परंतु यावेळी दिल्ली–छउठ सह संपूर्ण उत्तर भारतात पाऊस जोरात सुरू आहे. यावर्षी ऑगस्टमध्ये पाऊस सामान्यपेक्षा ४८% जास्त झाला आहे. यावेळी, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा आणि जम्मू–काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. याशिवाय पंजाबमध्ये ४० वर्षांने पूरही आला आहे. पावसाचा हा कालावधी अद्याप संपलेला नाही, या आठवड्यातदेखील मुसळधार पाऊस सुरू राहण्याची अपेक्षा आहे असा अंदाज खचऊ अर्थात हवामान खात्याने दिला आहे.

संपूर्ण आठवड्यात पाऊस



खाजगी हवामान संस्थेच्या स्कायमेट वेदरनुसार, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिल्ली–एनसीआरमध्ये पावसाची शक्यता आहे. २ सप्टेंबर रोजी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी एक किंवा दोन मुसळधार पाऊस पडू शकतो. यासोबतच, जोरदार गडगडाटासह विजांचा कडकडाट देखील होऊ शकतो. हवामानातील बदलाचा बहुतांश परिणाम संध्याकाळी आणि रात्री दिसून येईल.

## शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक!

नवी दिल्ली : शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी)उत्तीर्ण करणे आता शिक्षकांसाठी बंधनकारक आहे, असा मोठा निर्णय सोमवारी शिक्षकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिला. टीईटी परीक्षा उत्तीर्ण असेल तरच शिक्षकांना सेवेत कायम ठेवता येईल किंवा त्यांना पदोन्नती मिळेल. निवृत्तीला फक्त पाच वर्षे शिल्लक राहिलेल्या शिक्षकांनाच टीईटीमधून सूट दिली जाईल. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, ज्यांची निवृत्ती पाच वर्षांवर आली आहे ते कोणत्याही



टीईटीशिवाय त्यांचा सेवाकाळ पूर्ण करू शकतील. मात्र पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बाकी असलेल्यांना टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जर ते टीईटी उत्तीर्ण झाले नाही तर त्यांना नोकरी सोडावी लागेल किंवा स्वेच्छानिवृत्ती घेऊन टर्मिनल बेनिफिट्स घ्यावे लागतील असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने २०१०मध्ये पहिली ते आठवीपर्यंत शिकवण्यासाठी किमान योग्यता निश्चित केली होती. त्यानंतरच टीईटीला शिक्षक भरतीसाठी बंधनकारक केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता टीईटीची अट बंधनकारक केली जाणार आहे. महाराष्ट्र, तामिळनाडु सह वेगवेगळ्या राज्यातून टीईटी संदर्भात याचिका दाखल झाल्या होत्या. या याचिकांमध्ये टीईटी उत्तीर्ण नसेल तरी शिक्षक म्हणून कायम रहावे का आणि पदोन्नती मिळावी का असे प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालयाने यावर सुनावणी करताना टीईटी बंधनकारक केली आहे.

# मुंबईला वेठीस धरू नका, आझाद मैदानव्यतिरिक्त रस्ते मोकळे करा

मुंबई : मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील आणि आंदोलकांनी न्यायालयाच्या आदेशाचे आणि पोलिसांनी आंदोलनासाठी दिलेल्या परवानगीचे सर्रास उल्लंघन केले आहे. तसेच, गेल्या तीन दिवसांपासून विनापरवानगी आंदोलन केले जात असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, मुंबईकरांचे जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी जरांगे यांच्यासह आंदोलनाच्या आयोजकांना मंगळवारी दुपारी चारपर्यंत परिस्थिती सुधारण्याची मुदत दिली आहे. त्यात आझाद मैदानाचा अधिसूचित भाग वगळता रस्ते मोकळे करणे, ते स्वच्छ करण्याचा प्रामुख्याने समावेश आहे.

या आदेशाचे पालन केले गेले नाही तर सरकार आंदोलकांवर कायद्यानुसार कारवाई करू शकते, असेही न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्याचवेळी, यापुढे मुंबईत येणाऱ्या मराठा आंदोलकांना मुंबईच्या वेशीबाहेर रोखण्याचे आणि तेथूनच परत पाठवण्याचे आदेश सरकारला दिले. आमरण उपोषण करणाऱ्या जरांगे यांची वैद्यकीय तपासणी करण्याचेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. वैधानिक मागणीसाठी आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी त्यासाठी मुंबईकरांना वेठीस धरण्याचा अधिकार नाही, असेही न्यायालयाने सुनावले.

पोलिसांनी जरांगे यांना आंदोलनासाठी केवळ एक दिवसाची परवागी दिली होती. तसेच, पाच हजार आंदोलक आणि १५०० वाहने मुंबईत आणण्याची अट घातली होती. आंदोलन शांततेत केले जाईल, अशी हमीही जरांगे यांनी दिली होती. परंतु, प्रसिद्धीमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांची दखल घेता जरांगे यांनी परवानगीनंतरही आंदोलन सुरू ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी आंदोलन तीव्र करून राज्यभरातील लाखो मराठ्यांनी मुंबईत यावे, असे आवाहन केले आहे. शिवाय, पाच हजारांहून अधिक आंदोलक मुंबईत आले असून त्यांनी मुंबई विशेषकरून दक्षिण मुंबईतील रस्ते, शिवाजी छत्रपती महाराज स्थानक (सीएसएमटी) मंत्रालय, हुतात्मा चौक येथील रस्ते अडवले आहेत. त्यांनी ते नुसते अडवलेले नाहीत तर तेथे जेवण करणे, नाचणे, नैसर्गिक विधी करणे, खो–खो, कबड्डी, क्रिकेटसारखे खेळ खेळले जात आहेत. हे न्यायालयाचे आदेश आणि पोलिसांना दिलेल्या हमीचे सर्रास उल्लंघन आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईत सुरू केलेल्या आंदोलनाविरोधात केलेल्या जनहित याचिकेवर सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. आंदोलन हाताबाहेर गेले आहे. आम्ही संयम ठेवला कारण काही तरी चांगल व्हावे, अशी आमची इच्छा होती, असे स्पष्ट करत पावसात आंदोलन करताय तर चिखलात बसण्याची तयारी ठेवा, असेही न्यायालयाने सुनावले.

मराठा आंदोलनामुळे मुंबईकरांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी एमी फाऊंडेशनच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेमध्ये करण्यात आली होती. याचिककर्त्यांची मागणी मान्य करत न्यायमुर्ती रवींद्र घुगे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर तातडीची सुनावणी झाली. या आंदोलनाचा मुंबईकरांना त्रास होवू नये. उद्या शाळा आणि कॉलेजवरही परिणाम होईल. आम्ही आंदोलनाच्या विरोधात नाही मात्र नियम व अटींचे पालन करा. मुंबईकरांना उगाच त्रास होत कामा नये. २६ ऑगस्टला आम्ही दिलेल्या निर्देशाचे काटेकोर पालन करा, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला.

आंदोलकांकडून नियमांचे उल्लंघन : महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ

काही नियमांचे पालन करण्याच्या शर्थीवर आंदोलनास परवानगी देण्यात आली होती. तिथे कुणीही उघड्यावर घाण करू नये, वाहतुकीस अडथळा आणू नये, पोलिसांनी अटकाव करू नये, सायंकाळी ६ नंतर आंदोलन संपवून जागा रिकामी करावी, अशा अनेक अटीशर्ती घालूनच केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. राज्य सरकारने या आंदोलनातील मागण्यांचा विचार करण्याकरता एक समिती तयार केली आहे. त्या समितीच्या माध्यमातून मागण्यांचा विचारही सुरू आहे. तसेच आंदोलकांशी चर्चादेखील सुरू आहे. हमीपत्र देताना अटींचे पालन केले जाईल, असे आंदोलकांकडून सांगण्यात आले होते. मुंबईत पाच हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. मात्र या अटींचे उल्लंघन झाले आहे. हजारो



आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. आंदोलकांनी सध्या मुंबईला खेळाचे मैदान बनवले आहे. पोलिसांचे निर्देश पाळले जात नाहीत. संपूर्ण दक्षिण मुंबईत रास्ता रोको केला जात आहे, अशी माहिती महाधिवक्त्यांनी दिली.

ओबीसी प्रवर्गात आम्हाला दुसरे वाटेकरी नको : छगन भुजबळांचा इशारा

आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही देखील लाखोंच्या लोंढ्यासह मुंबईत दाखल होणार आणि आम्हाला कोणीही रोखू शकणार नाही, असा इशारा छगन भुजबळ यांनी दिला. तसेच ओबीसी प्रवर्गात अजून कोणत्याही जातीला आणू नका, असेही त्यांनी पत्रकार परिषदेतून म्हटले. मराठा समाज मागास नाही हे सुप्रीम कोर्टाने सांगितले. तसेच मराठा–कुणबी एकच मानणे हे सामाजिक मूर्खपणाचे असेही कोर्टाने म्हटले आहे. सामाजिक मागास नाही अशासाठी व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना ईडब्ल्युएस लागू करण्यात आले आहे. मराठा समाजाला जे काही दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे, ते देखील टिकवण्यासाठी कोर्टात लढाई सुरू आहे. आता यांची मागणी आहे की ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे.

मराठा समाज ज्यावेळी आला तेव्हा देशमुख कमिटी, बापट कमिटी व इतर दोन आयोगांनी नकार दिला. सुप्रीम कोर्टाने नकार दिला, उच्च न्यायालयाने नकार दिला. मुख्यमंत्र्यांच्या हातात काहीच नाही. शरद पवारांनी जे मंडल आयोगाने सांगितले त्याची फक्त अंमलबजावणी केली. आयोगाने मान्य केले तरच एखाद्या जातीला आरक्षण दिले जाते. मुख्यमंत्री किंवा कोणत्याही सरकारच्या हातात हे नसते. त्यामुळे फडणवीस यांना नाव ठेऊन काहीच होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

न्यायालयाच्या आदेशानंतर कडक कारवाई करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई केली जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोर्टाने कडक आदेश दिल्यानंतर आता कडक कारवाई करावी लागेल. सरकारला आडमुठेपणाची भूमिका घेता येत नाही. सरकार अहंकार ठेवत नाही. जो शक्य आहे तो मार्ग काढत आहोत. जर चर्चेला कोणी समोर आलं तर लवकर होईल. कायदेतज्ज्ञांनी आणि सुप्रीम कोर्टाने हा केंद्राच्या नाही

## संपादकीय

# शिक्षण क्षेत्रातील विषमता आणि आंबेडकर

एक जातवर्ग उच्चशिक्षित, तर दुसरा अल्पशिक्षित हे वास्तव शिक्षण क्षेत्रात आजही कायम आहे. जाती निर्मूलनाचे तत्वज्ञान मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचे प्रभूत्व शिक्षणातील प्रभूत्वावर आधारलेले आहे, हे उलगडून दाखवले.एक जातवर्ग उच्चशिक्षित, तर दुसरा अल्पशिक्षित हे वास्तव शिक्षण क्षेत्रात आजही कायम आहे. जाती निर्मूलनाचे तत्वज्ञान मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचे प्रभूत्व शिक्षणातील प्रभूत्वावर आधारलेले आहे, हे उलगडून दाखवले.स्तरीकरण व उतरंडीची रचना हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेचे विशेष लक्षण राहिले आहे. गुरुकुल या पहिल्या औपचारिक शिक्षण व्यवस्थेपासून उतरंडीची रचना अस्तित्वात आली आहे. ब्राह्मणी व्यवस्थेचे अपत्य म्हणून ब्राह्मणी शिक्षण व्यवस्था समावेशक राहिली नाही. जाती व्यवस्था सातत्याने कार्यरत आहे. या व्यवस्थेचा भौतिक ढांचा व नीती मूल्य शिक्षण क्षेत्रात प्रभावी राहिले आहे.डॉ. आंबेडकरांनी जाती निर्मूलनाचे तत्वज्ञान मांडले. जाती व्यवस्थेचे पदर उलगडत त्यांनी ते समाजजीवनाच्या विविध घटकांना लावून दाखवले. शिक्षण हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. डॉ आंबेडकरांचे शिक्षणविषयक लिखाण व भाषणे त्यांच्या साहित्यात विखुरलेली आहेत. शिक्षणावर प्रासंगिक लिखाण व भाषणे त्यांनी केली आहेत. त्यांच्या लिखाणातून व भाषणांमधून त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. जातिव्यवस्थेचे प्रभूत्व शिक्षण व्यवस्थेवर आधारलेले आहे, ती समावेशक नाही, ही मूलभूत मांडणी त्यांच्या लिखाणात व भाषणांमध्ये आढळते. उतरंडीच्या समाज रचनेत प्रत्येक जातवर्गाचे शिक्षणाचे प्रमाण भिन्न असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले.

प्रमुख चार वर्गातील भिन्न प्रमाण

१९१६-१७ ते १९२२-२३ या सहा वर्षांतील शिक्षण वास्तव मांडताना डॉ. आंबेडकरांच्या व्यापक व सखोल दृष्टिकोनाचा परिचय होतो. १९१६ ते १९२३ या सहा वर्षांच्या प्रातिनिधिक अभ्यासातून स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणाचे विदारक वास्तव त्यांनी मांडले. प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील प्रमाण सामाजिक आर्थिक स्तरानुसार अस्तित्वात आल्याचे त्यांनी एका प्रसंगी शिक्षण मंत्री व आर्थिक समिती सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले. बॉम्बे विभागातील जनगणनेच्या अहवालाप्रमाणे विकसित हिंदू, (-वींरपलशव क्ळपर्वी - ब्राह्मण व इतर उच्च जाती), मुस्लिम, मध्यम वर्ग (खपींशीाशवळरींश उश्ररीी - ब्राह्मणेतर मराठा इत्यादी) व मागास वर्ग (इरलज्ञुरीव उश्ररीी - शोषित वर्ग, आदिवासी, गुन्हगारी जमात इत्यादी जातवर्ग) असे चार वर्ग आहेत. या वर्गांमध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील प्रमाण भिन्न असल्याचे आकडेवारीसह त्यांनी सादर केले.

संचालक, सुचना विभाग, बॉम्बेच्या अहवालावरुन वर्गनिहाय शिक्षणातील टक्केवारी त्यांनी मांडली. त्या त्या वर्गाच्या लोकसंख्येवरुन शिक्षणाचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते. प्राथमिक शिक्षणात उच्च जातींचे प्रमाण ११.९ टक्के, मुस्लिम ९.२ टक्के, मध्यम वर्ग ३.८ टक्के व मागासवर्गीयांचे प्रमाण १.८ टक्के होते. या टक्केवारीतून चारही वर्गातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती समाधानकारक नव्हती, हे स्पष्ट होते. माध्यमिक आणि उच्च शिक्षणात चारही वर्गांची टक्केवारी मोठ्या प्रमाणात घसरली होती. त्यात सर्वाधिक चिंताजनक टक्केवारी मागासवर्गीयांची होती. माध्यमिक शिक्षणात मागासवर्गीयांचे प्रमाण ०.०१४ टक्के, तर उच्च शिक्षणात ० टक्के होते.

# 'रामटेक' वरील बाप्पांचे थाटात विसर्जन ; भक्तीभावाने निरोप देताना ना. पंकजाताई मुंडे भावूक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह अनेक मंत्री, आमदारांनी घेतले दर्शन : उद्योजक, सेलिब्रेटींही दाखल





मुंबई।दिनांक

परंपरेनुसार पाच दिवसाच्या गणपतीचे आज 'रामटेक' निवासस्थानी प्रतिस्थापित केलेल्या पर्यावरण पूरक श्री गणेशाचे आज वाजतगाजत थाटात विसर्जन करण्यात आले. लाडक्या बाप्पाला भक्तीभावाने निरोप देताना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे भावूक झाल्या होत्या. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अनेक मंत्री, आमदार, विविध क्षेत्रातील उद्योजक आणि सिनेक्षेत्रातील कलाकारांनी रामटेकवर येऊन गणरायाचे दर्शन घेतले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या मुंबई येथील 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी पहिलाच गणेशोत्सव अत्यंत मंगलमय वातावरणात आणि हर्षोल्हासात साजरा झाला. काल पाचव्या दिवशी परंपरे प्रमाणे श्री गणेशाचे विधीवत विसर्जन झाले. हा क्षण अत्यंत भावुक होता. बाप्पा रामटेक बंगल्याच्या बाहेर जाईपर्यंत पंकजाताई डोळयात पाणी आणून एकटक त्याच्याकडे पहात होत्या. ईश्वरभक्तीमध्ये तल्लीन झालेल्या या लोकनेतृत्वाचा भक्तीभाव पाहून सर्वांचेच मन हेलावून गेले होते.

मुख्यमंत्र्यांसह, मंत्री, आमदार, सेलिब्रेटींची गर्दी

ना. पंकजाताई रामटेकवर रहायला आल्यानंतर पहिलाच गणेश उत्सव मोठया थाटात साजरा झाला. पाच दिवस गणेश भक्तांसह व्हीव्हीआयपी, सेलिब्रेटी, कलाकार, साहित्यीक यांची मोठी रेलचेल पहायला मिळाली. या काळात मुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद सभापती यांच्यासह जवळपास दहा मंत्री आणि अकरा आमदार गणेशाच्या दर्शनासाठी येवून गेले. त्यांनी गणपतीचे दर्शन घेतले. मात्र महाराष्ट्राला या निमित्ताने पंकजाताईच्या अलौकिक लोकप्रियतेचे दर्शन घडले. या गणेश उत्सव काळात रामटेकवर भेट देणाऱ्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, माजी खा. समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ, गृहराज्यमंत्री पंकज भोयर, रा.स्व. संघाचे अ.भा.सह संपर्कप्रमुख सुनिलराव देशपांडे, मंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योगपती सुबोध रुणवाल, सनदी अधिकारी अविनाश ढाकणे, मंत्री जयकुमार रावल, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंत्री गिरीश महाजन, रश्मी उध्दव ठाकरे, माजी आ. धिरज देशमुख, अभिनेता जॅकी भगनानी, मंत्री प्रताप सरनाईक, केंद्रीयमंत्री रक्षा खडसे, सुप्रसिध्द अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, शरद पवार यांचे जावई सदानंद मुळे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आ. श्वेता महाले, आ. अतुल भातखळकर, आ. मनिषाताई चौधरी, आ. योगेश सागर, आ.राज पुरोहित, आ. मिलिंद नार्वेकर, आ. विद्याताई ठाकुर, प्रदुषण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम, पद्मश्री तात्यासाहेब लहाने, आ.प्रविण दरेकर, आ.प्रसाद लाड, आ. नमिता मुंदडा आदींचा समावेश होता. ना. पंकजाताई, मुलगा आर्यमान यांनी सर्वांचे स्वागत केले.

# राष्ट्रसंत भगवानबाबांनी पशुहत्या बंद केली- फुलचंदराव कराड

## लिंबोटा येथे भगवानबाबांची जयंती उत्साहात साजरी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

वारकरी संप्रदायात राष्ट्रसंत भगवानबाबांची शिकवण मोठी असुन त्यांनी केवळ गोहत्याच नव्हे तर पशुहत्या बंद केली होती.यासाठी त्यांनी आपल्या किर्तनाद्वारे गावोगावी प्रचार केला असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी केले.

परळी तालुक्यातील लिंबोटा येथे राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यानिमीत सकाळी ९ वाजता फुलचंदराव कराड यांच्या हस्ते संत भगवानबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी बोलताना कराड म्हणाले की भगवानबांच्या गडाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण आले होते यावरूनच भगवानबाबांची महंती सिध्द होते.ते पाण्यावर बसुन ज्ञानेश्वरी वाचत होते.एकाचवेळी दोन गावांत त्यांचे किर्तन झाल्याच्या अख्यायिका आहेत.बाबांमुळे लोक वारकरी सांप्रदायाकडे मोठ्या प्रमाणावर वळले असुन आमचे लिंबोटा गाव छत्रपती शिवाजी महाराज,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,राष्ट्रसंत भगवानबाबा अशा संत,महापुरुषांच्या जयंत्या सर्वजण मिळुन साजरा करणारे गाव असुन सर्व जाती- धर्माचे लोक एकदिलाने रहातात.गावाच्या एकजुटीमुळे सर्व काही सुरळीत चालत असल्याचे सांगितले.दुपारी १ ते ३ या वेळेत ह.भ.प.तुकाराम महाराज शास्त्री यांचे किर्तन झाले.यात त्यांनी संत भगवानबाबा यांचे संपूर्ण चरित्र सांगितले.या कार्यक्रमास दिलीप आण्णा कराड,सुदामअप्पा मुंडे,मा.सरपंच सुर्यकांत मुंडे,ग्रा.प.सदस्य अरुण मुंडे,रवी कराड,सुधाकर बनसोडे,विश्वनाथ मुंडे,जयराम बापु,मनोज मुंडे,इंद्रमोहन मुंडे,महादेव कराड,प्रशांत कराड,बालु कराड,रामा कराड,मंचक मुंडे आदींसह गांवकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# वैद्यनाथ बँकेच्या अध्यक्षपदी फेर निवड झाल्याबद्दल विनोदसेठ सामत यांचा श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने सत्कार



परळी (प्रतिनिधी)

येथील वैद्यनाथ बँकेच्या अध्यक्षपदी फेर निवड झाल्यानंतर श्री शनी मंदिरात श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने विनोद सामत यांचा सत्कार करण्यात आला. श्री वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात सध्या जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात असून या ठिकाणी श्री विनोद सामत यांनी मोठा हातभार लावून आपला वाटा उचलला आहे. भोजनाची व्यवस्था असलेल्या तळघरात आणि विवाह व सभागृह असणाऱ्या भागात त्यांनी सुंदर फरशी दिलेली आहे. यामुळे मंदिराच्या सुशोभीकरणात भर पडली असून भाविकांची मोठी सोय झाली आहे. विनोद सामत वैद्यनाथ बँकेच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर ते दर्शनासाठी आले होते. यावेळी श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्ट व तेली समाजाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ , पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे व्यवस्थापक चंद्रकांत उदगीरकर, कोलूघाणा सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, वैद्यनाथ बॅकेचे संचालक तांदळे, शिवकुमार व्यवहारे, श्री साखरे, छगन क्षीरसागर, अशोक बेंडे, सतिश देशमाने, नरेश साखरे आदी उपस्थित होते.

# हृदय द्रावक घटना; घोडेगाव येथील दोन शाळकरी मुलांचा पाझर तलावात बुडून मृत्यू





खुलताबाद / हरिदास सराटे (दै.महाभारत)

दिनांक ३०-०८ २०२५ शनिवारी रोजी खुलताबाद तालुक्यातील सोनखेडा शिवारात असलेल्या पाझर तलाव परिसरात गुरे चारण्यासाठी गेले होते पण... पोहण्याचा मोह न आवरल्याने तसेच तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने दोन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

घोडेगाव येथील सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वीच्या वर्गात शिक्षण घेणारे व कायम सोबत असणारे दोन हुशार मित्र अनिकेत बनकर (वय -१६ वर्ष, रा.देवळाणा बु. हल्ली मुक्काम घोडेगाव) व आकाश गोरे (वय-१६ वर्ष,रा.घोडेगाव) हे शाळा सुटल्यानंतर गुरे चारण्यासाठी सोनखेडा शिवारात पाझर तलावाच्या परिसरात गेले असता, तेथील पाण्यामध्ये पोहण्याचा त्यांना मोह आवरला नाही व तेथे असलेल्या पाण्याचा अंदाज देखील त्यांना न आल्याने दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली.

सदरील घटनेची माहिती ही शेजारी गुरे चारण्यासाठी असलेल्या गुराखी यांनी त्यांच्या तलावाच्या कडेला पडलेल्या चपला व कपडे दिसल्याने संबंधित माहिती ही सोनखेडा येथील ग्रामस्थ,प्रभारी पोलिस पाटील आजिनाथ जाधव व घोडेगाव येथील पोलीस पाटील/ ग्रामस्थ यांना कळविली. या घटनास्थळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांनी धाव घेत, पोहण्यामध्ये तरबेज असलेल्या ग्रामस्थांनी तलावात उतरून दोन्ही मुलांचा शोध घेतला असता,बऱ्याच वेळाने त्यांना पाण्याबाहेर काढण्यात आले.

सदरील घटनेची माहिती ही पोलीस पाटील यांनी पोलीस ठाणे-खुलताबाद येथे कळवुन आकाश रमेश गोरे याला ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद व गदाणा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र-गदाणा येथे अनिकेत रमेश बनकर याला नेले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषित केले.

# राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष महानगरपालिका ,जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणूका ताकदीने लढवणार - अण्णासाहेब कटारे



नाशिक / शांताराम भाऊदुनबळे (दै.महाभारत)

नाशिक-: राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाची नाशिक कार्यकारणी बैठक नाशिक येथे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत मार्गदर्शन करतांना

अण्णासाहेब कटारे यांनी सांगितले की महाराष्ट्रातील जनतेने कुठल्याही एका प्रस्थापित पक्षाला लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकीत पूर्णपणे समर्थन दिले नाही त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेचा कौल वेगळाच दिसून येत असल्याने, सरंजामी प्रस्थापित भांडवलदार पक्षांना आता येथील जनता कंटाळली आहे. जातीय / धार्मिक ध्रुवीकरण करून मते घेण्याचा काही पक्षानी केविलवाणा प्रयत्न केला.


वास्तविक पाहता या देशातील राज्यातील कोणताही प्रस्थापित पक्ष येथील गोरगरीब दलित वंचित अल्पसंख्यांक बौद्ध ओबीसी समुहाला राजकीय प्रतिनिधीत्व देण्यास तयार नाही.केवळ ह्या घटकांची निवडणूकीत मते लाटून त्यांना नंतर वाऱ्यावर सोडायची हीच नीती वर्षानुवर्षी सुरू आहे.

म्हणूनच राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षानी राज्यातील सर्वच पुरोगामी छोटे-मोठे पक्ष संघटना यांना एका व्यासपीठावर आणून आगामी होणाऱ्या महानगरपालिका,जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणूका लढवल्या जातील असे अण्णासाहेब कटारे यांनी बैठकीत सांगितले.

रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचा जनाधार मोठ्या प्रमाणात आहे.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई या सर्वच विभागांमध्ये राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाची संघटनात्मक ताकद आहे. ज्या भागांमध्ये पक्ष उत्तम प्रकारे निवडणुकीत परफॉर्मन्स उभा करू शकतो अशा ठराविक भागात राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष आपले उमेदवार उभे करणार असून, त्या अनुषंगाने विभागीय बैठका, मेळावे, जाहीर सभा, पत्रकार परिषद, राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांचे नेतृत्वाखाली सुरू आहे व आगामी निवडणुकीसाठी सर्व राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा अशा सूचना कटारे यांनी दिल्या आहे.

बैठकीस राष्ट्रीय प्रवक्ते गिरीश जी अकोलकर,युवा नेतृत्व बिपिन कटारे,नाशिक जिल्हा नेते मनोहर दोंदे,महाराष्ट्र युवा उपाध्यक्ष नितीन केदारे सर,नाशिक युवा जिल्हाध्यक्ष जितु भाऊ बागुल,नाशिक शहराध्यक्षा रेश्मा ताई बच्छाव,नाशिक शहर नेते निसार भाई खान,नाशिक शहर नेते गौतम दोंदे,येवला युवा नेते तुषार वाघ,महाराष्ट्र संपर्कप्रमुख युवा आघाडी संतोष राजगुरू,प्रशांत कटारे,नाशिक शहर हेमंत आहेर,येवला उपाध्यक्ष बबन वाघ, प्रसिद्ध प्रमुख वाल्मीक खरात,जुनेद शेख,आकाश आव्हाड,आदी उपस्थित होते




# शिक्षण उपसंचालक कार्यालयात शिक्षक दरबाराचे आयोजन



निफाड /रामभाऊ आवारे

नाशिक विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात शिक्षक आमदार किशोर भिकाजी दराडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण उपसंचालक श्री संजय राठोड साहेब, नाशिक विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी प्रविण पाटील साहेब, उपशिक्षणाधिकारी उदय देवरे साहेब, उपशिक्षणाधिकारी गणेश फुलसुंदर साहेब, उपशिक्षणाधिकारी प्रकाश अहिरे साहेब, माध्यमिक विभागाचे वेतन अधीक्षक नितीन पाटील साहेब तसेच जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी प्रमुख उपस्थितीत शिक्षक दरबाराचे आयोजन करण्यात आले. या दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर भाऊ दराडे साहेब यांनी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून या दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे असे प्रतिपादन केले. या दरबाराचे प्रारंभी मुख्याध्यापक संघ व विविध शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष संजय चव्हाण यांनी जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांचा लेखाजोखा मांडला. विषय पत्रिकेनुसार शालार्थ आय. डि.मान्यता, टप्पा अनुदान मान्यता, संच मान्यता, पदोन्नती मान्यता, थकित बिल मंजुरी आणि वितरण, संस्था अंतर्गत वादामुळे रखडलेल्या वैयक्तिक मान्यता, काही शाळांचे थांबवलेले वेतन, सन २००५ पूर्वी नियुक्ती परंतु त्यानंतर १००% अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी . शाळा कर्मचारी यांचे अभिलेख डिजिटीलायझेशन करणे कामी कागदपत्रे डाऊनलोड करणे साठी मुदतवाढ मिळणे आदी मागण्या करण्यात आल्या असून या संदर्भात अधिक माहिती शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी वरील सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी वरील सर्व समस्या सोडविण्यासाठी शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच विभागातील शिक्षण विभागाचे अधिकारी व जिल्हा निहाय मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी व विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ११/९/२०२५ रोजी दुपारी बारा वाजता पुन्हा शिक्षक दरबाराचे आयोजन करण्यात येईल असे प्रतिपादन केले. शिक्षक आमदार किशोर दराडे साहेब यांनी विना अनुदानित शाळा टप्पा अनुदानाबाबत विशेष लक्ष केंद्रित करून राज्यातील शाळांच्या या प्रश्नाबाबत अनेक वेळा आंदोलन, मोर्चे काढून पाठपुरावा करून टप्पा अनुदानाची मागणी पूर्ण केली त्याबद्दल जिल्हा मुख्याध्यापक संघ व विविध शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जाहीर सत्कार करण्यात आला. या दरबाराच्या प्रसंगी माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. गोरख कुणगर प्रदीप सांगळे,एस के सावंत,एस. बी.देशमुख, भागिनाथ घोटेकर, बाळकृष्ण नागरे,डॉ. अनिल माळी , सुरेश घरटे,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष संजय चव्हाण, शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष मोहन चकोर, जयवंत भाबड, विजय बडे,एम के वाघ,रघुनाथ गायकवाड,एम के काळे तसेच जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. ११ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिक्षक मेळाव्यासाठी बोर्डच्या समस्या सोडविण्यासाठी मोठ्या संख्येने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ कार्यालय आडगाव नाशिक येथे उपस्थित राहावे असे आवाहन नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक जय महाभारत

# चोपड्यात ७१ सार्वजनिक मंडळामार्फत धुमधडाक्यात श्रीं चे विसर्जन

चोपडा / महेश शिरसाठ (दै.महाभारत)

तरुणांमध्ये प्रचंड उत्साह आणि गुलालाची उधळण करीत जोशपूर्ण ढोल ताशांच्या निनादात गणपती विसर्जन शहरात रात्री उशिरापर्यंत संपन्न झाला. शहरात पाचव्या दिवशी श्रींचे विसर्जन होत असल्याने शहरातील जवळपास ७१ सार्वजनिक गणेश मंडळतर्फे श्रीं ना निरोप देण्यात आला. यावर्षी ५० च्यावर गणेश मंडळ पदाधिकारी यांचेकडून २० फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्ती असल्याने मिरवणुकीस कसरत करून पार करावी लागली. मेन रोड चे काँक्रीटीकरण झाल्याने या वर्षी मिरवणुक साठी सोयीचे झाले. विसर्जन मिरवणुकीत मनसे चे माजी जिल्हाध्यक्ष अनिल वानखेडे यांचा गणपती सर्वात प्रथम सकाळी साडेनऊ वाजताच विसर्जन मार्गावरून मार्गस्थ झाला . जवळपास १८ ते २० तास चालणारी ही मिरवणूक खऱ्या अर्थाने सायंकाळी पाच वाजेपासून सुरू होते. तालुका भरातून ग्रामीण भागातील प्रचंड भाविक भक्त या विसर्जन मिरवणुकीला पाहण्यासाठी आलेले होते. त्यामुळे गर्दीला उधान आलेले होते. शहरातील अरुंद गल्यांमुळे




मिरवणुकीला खोळंबा होत असतो. त्यामुळे मिरवणूक रात्री बारा वाजेपर्यंत संपू शकत नाही, परंतु यावर्षी शांतता कमिटीच्या बैठकीत पोलीस अधीक्षक महेश्वरी रेड्डी यांनी रात्री १२ वाजे पर्यंत मिरवणूक अटोपण्यासाठी प्रयत्न केले. नंतर वाजंत्री वाजवली तर गुन्हे दाखल होतील आणि कोणतीही वाजंत्री वाजवता येणार नाही असा इशारा दिला होता.

गणपती विसर्जन मिरवणुकीचा मार्ग :- आशा टॉकीज, गोल मंदिर, चावडी,बोहरा गल्ली, मुस्तफा बाबा मशीद, आझाद चौक, पाटील दरवाजा, बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्टँड या मार्गे नेहमीप्रमाणे पार पडली. गणपती विसर्जनाची मिरवणूक बोहरा गल्लीमध्ये रेंगाळत रेंगाळत सरकत होती. त्या ठिकाणी गणपती मंडळे लवकर पास होत नसल्याने यावर्षी चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांनी कसब पणाला लावून मंडळ कार्यकर्त्यांना पुढे सरकवत नेले होते.

तगडा पोलीस बंदोबस्त - दरम्यान चोपडा शहरातील मिरवणुकीला गालबोट लागू नये म्हणून पोलीस अधीक्षक महेश्वरी रेड्डी यांच्या मार्गदर्शनाने चोपडा शहरात चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवलेला होता. चोपडा शहरात छावणीचे स्वरूप या बंदोबस्तानंतर प्राप्त झालेले होते. शहरातील गणपती मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडावी यासाठी शहर पोलिसांना शांतता कमिटीचे सर्व सदस्य, सर्वपक्षीय प्रमुख नेते, पत्रकार सर्व पक्षाचे पदाधिकारी, पोलीस पाटील संघटना, पोलीस मित्र , शहरातील प्रतिष्ठित नागरिक यांचे सह ग्रामीण पोलीस स्टेशन चे अधिकारी पोलीस कर्मचारी हे मिरवणुकीत सहभागी झाले होते.

सर्व पक्षीय नेत्यांचे शुभेच्छा स्टॉल : - विविध पक्षांचे मंडळ पदाधिकारी यांना शुभेच्छा देणारे स्टॉल्स उभारण्यात आले होते. सर्व पक्षांचे स्वतंत्र असे शुभेच्छा स्टॉल्स लावण्यात आले होते.प्रत्येक मंडळ अध्यक्षांचा गुलाबपुष्प ,श्रीफळ आणि ट्रॉफी देवून सत्कार करण्यात आला.काँग्रेस,राष्ट्रवादीचे फूट पडलेले दोन्ही गटांचे,शिवसेना पक्षाचे दोन्ही गटांचे ,भाजपाचे आणि नगर पालिकेचे अधिकाऱ्यांमार्फत शुभेच्छा स्टॉल्स लागलेले होते. विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे,माजी आमदार लता सोनवणे,माजी आमदार कैलास पाटील, माजी आमदार जगदीश वळवी, साखर कारखान्याचे चेअरमन चंद्रासभाई गुजराथी,काँग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष ड.संदीप पाटील,भाजपाचे माजी सभापती आत्माराम म्हाळके,डी.पी.साळुंखे,पप्पू पाटील, महाजन, राकेश पाटील,किशोर चौधरी,संजीव सोनवणे,प्रदीप पाटील,नंदकिशोर सांगोरे,राजेंद्र बिटवा आदी उपस्थित होते.

# फुलंब्री येथे भटके विमुक्त जाती दिवस साजरा




फुलंब्री/ सुधाकर जेठे/( दैनिक महाभारत) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे तहसील प्रशासन तर्फे ३१ ऑगस्ट हा दिवस भटके विमुक्त जाती दिवस साजरा करण्यात आला या निमित्ताने महसूल विभागामार्फत दिले जाणारे रहिवासी, उत्पन्न, जातप्रमाणपत्र, आधार कार्ड , जन्म दाखला व इतर आवश्यक प्रमाणपत्रसाठी लागणारे कागदपत्रे, त्याचे फायदे या बाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगेश जाधव यांनी केले, रमेश महालकर यांनी प्रमाणपत्राची व प्रमाणपत्रसाठी लागणाऱ्या कागदपत्राची माहिती दिली त्यावेळी नायब तहसीलदार संजीव राऊत , भाजपा जिल्हा चिटणीस तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते वाल्मीक जाधव, सोमनाथ रसाळ, तालुक्यातील आपले सरकार केंद्र चालक अमोल चित्रक, निलेश शेरकर, पवन नागलोद, मनगटे, सुरेश मुळे, साळवे व भटके विमुक्त जाती समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेंडके कुटुंबात गौराई आल्या बुलेट सोनपावली

## माजलगाव परिसरात उत्साहात स्वागत

माजलगाव : अमर साळवे ( दै. महाभारत )

महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरी, अर्थात संपत्तीची देवता, ज्येष्ठा, कनिष्ठा गौरी लक्ष्मीचे प्रतीक आहे. त्या ज्येष्ठा कनिष्ठा गौरी महालक्ष्मीचे रविवारी दि.३१ माजलगाव येथील तानाजी नगर परिसरासह तसेच जिल्हाभरात घरोघरी उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावर्षी महिलांनी रविवारी सायंकाळी ५:२५ पर्यतचा मुहूर्त साधून गौरींचे पूजन करून घरात आणले. तीन दिवसीय उत्साह सोहळ्याला सुरुवात केली. काही कुटुंबीयांनी गौरींच्या उभारणीसाठी अगोदरच तयारी करून



ठेवली होती. मेंडके कुटुंबातील महिलांनी बुलेट बाईक वरील गोरी असा देखावा सादर केला.रविवारी रात्री गौरींची प्रतिष्ठापना केली व विविध धान्यांच्या राशी मांडून आकर्षक सजावट करण्यात आली.काल दि.१ सप्टेंबर सोमवार रोजी गौरीपूजन व भोजन झाले तसेच दि. २ मंगळवार रोजी गौरी विसर्जन रात्री ९:५० पर्यतचा मुहूर्त आहे. तानाजी नगर माजलगाव येथील प्रियंका रामेश्वर मेंडके यांच्या निवासस्थानी प्रतिवर्षाप्रमाणे मेंडके परिवारातील सुहासीनींनी व मुलींनी गौरींचे उत्साहात आगमन करून रविवार रोजी प्रतिष्ठापना केली.

# अल्पवयीन चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणारा नराधम अटक

बीड / सुनील जाधव (दै.महाभारत)

परळी शहर हादरवून टाकणारी एक अत्यंत भीषण आणि संतापजनक घटना घडली होती. अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याने समाजमन अस्वस्थ झाले आहे. या घटनेचे गांभीर्य ओळखून बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तात्काळ पोलीस यंत्रणेला सतर्क केले. त्यामुळे अवघ्या पाच तासांच्या आतच आरोपीला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.

घटनेची सविस्तर माहिती अशी की, पंढरपूर येथील एक कुटुंब आपल्या मुलाबाळांसह परळी येथे आले होते. दुपारी सुमारास त्यांनी परळी रेल्वे स्टेशनवरच जेवण आटोपून विश्रांती घेतली होती. त्याच दरम्यान शेख सजन शेख अल्लाभक्ष (वय ३१, रा. परळी)



हा नराधम त्या कुटुंबातील सहा वर्षांच्या चिमुकलीला रेल्वे स्टेशनवरील उड्डाणपुलाकडे घेऊन गेला. तेथे त्याने निर्लज्जपणे तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि त्यानंतर फरार झाला.

सदर घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ वरिष्ठांना माहिती दिली. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्वतः पुढाकार घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शोध मोहिमेसाठी रवाना केले.

पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज, तांत्रिक बाबी व गुप्त माहितीच्या आधारे अथक परिश्रम घेत अवघ्या पाच तासांतच आरोपीचा शोध घेतला. अखेर शेख सजन शेख अल्लाभक्ष याला जेरबंद करण्यात यश आले. या जलद कारवाईमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली असून आरोपीस कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी नागरिकांची मागणी आहे. समाजात महिला व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून अशा विकृत मानसिकतेच्या नराधमांना कायद्याच्या कचाट्यातून सुटका होऊ नये, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# अमरसिंह पंडित यांच्याकडुन शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा

## सुप्रसिद्ध व्याख्याते इंद्रजित देशमुख यांच्या उपस्थितीत शिक्षक दिनी होणार वितरण

गेवराई / प्रतिनिधी (दै.महाभारत)

शारदा प्रतिष्ठानच्या १७ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. शिक्षक दिनी दि. ५ सप्टेंबर रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते इंद्रजित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठानकडुन ११ आदर्श शिक्षकांचा गेवराई येथे गौरव होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देवुन आदर्श शिक्षकांचा सपत्नीक गौरव केला जाणार आहे. अमरसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या समारंभास आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शिक्षक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर यांनी केले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघातील गुणी गुरुजनांचा गौरव व्हावा, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या शिक्षकांना पुरस्कार देवुन त्यांना भरीव काम करण्याची उर्जा मिळावी आणि इतरांनी या पासुन प्रेरणा मिळावी यासाठी शारदा प्रतिष्ठान, गेवराई या सामाजिक स्वयंसेवी संस्थेकडुन मागील सोळा वर्षापासुन आदर्श शिक्षकांना पुरस्कार देवुन त्यांचा गौरव करण्याचे काम होत आहे. दरवर्षी शिक्षक दिनी या पुरस्काराचे वितरण नेत्रदिपक सोहळ्यात केले जाते. प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांना शैक्षणिक क्षेत्रात मानाचे स्थान आहे. यावर्षी शारदा प्रतिष्ठानच्या सतराव्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. जि.प.प्रा.शाळा, धुमेगांव येथील सहशिक्षक विठ्ठल देशमुख, जि.प.प्रा.शाळा, मोरे वस्ती, राजपिंप्री येथील सहशिक्षक कैलास पट्टे, जि.प.प्रा.शाळा, गुळज येथील सहशिक्षक भगवान मोरे, जि.प.प्रा.शाळा, हिवरा बु., ता. माजलगांव येथील सहशिक्षक ओमप्रकाश आगे, जि.प.प्रा.शाळा, सांडरवण, ता. बीड येथील सहशिक्षक बबन नांदे, जि.प.प्रा.शाळा, पाचेगांव येथील सहशिक्षिका पुष्पांजली दुधाळ, जि.प.प्रा.शाळा, मारफळा तांडा येथील सहशिक्षक विश्वभुषण सोनवणे, जि.प.माध्यमिक शाळा, तलवाडा येथील सहशिक्षक सतिष खेडकर, शारदा विद्या मंदिर, गेवराई येथील सहशिक्षक दादाराव काकडे, जि.प.माध्यमिक उर्दु (मुलींची) शाळा, गेवराई येथील सहशिक्षक महंमद इलियास आणि विशेष शिक्षक म्हणुन जि.प.प्रा.शाळा, केकतपांगरी येथील सहशिक्षक डॉ. तात्यासाहेब मेघारे यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा अमरसिंह पंडित यांनी केली आहे.

शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची निवड तज्ञ समितीकडुन केली जाते. या समितीमध्ये जेष्ठ शिक्षणतज्ञ नारायणराव मोटे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण काळम पाटील, सदस्य विजय डोंगरे, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विष्णू खेत्रे, तात्यासाहेब मेघारे, समन्वयक डॉ. एस.डी. पटेल यांचा समावेश आहे. या समितीने प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षकांची निवड केलेली आहे. शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या औचित्याने सकाळी १०:३० वा. गोदावरी सभागृह, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सोहळ्यात सुप्रसिद्ध विचारवंत तथा व्याख्याते इंद्रजित देशमुख यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे. या प्रसंगी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात आदर्श शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देवुन सपत्नीक गौरविण्यात येणार आहे. या प्रसंगी शिक्षक बांधवांसह शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर यांनी केले आहे.



# शिक्षक सेनेमध्ये जाहीर प्रवेश

सिंधीकाळेगाव/प्रतिनिधी (दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य अंदाज समिती प्रमुख तथा माजी राज्यमंत्री अर्जुन भाऊ खोतकर साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार काम करत असलेल्या शिक्षक सेना जालना संघटनेमध्ये.जालना जिल्हाध्यक्ष संतोष (अण्णा) डोंगरखोस यांच्या नेतृत्वात अंबड घनसावंगी तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था माजी चेअरमन महादेवजी वैराळ व प्रभारी केंद्रप्रमुख पाथरवाला चंद्रकांत खरात आणि लहू वीर सर यांचा शिक्षक सेनेमध्ये जाहीर प्रवेश. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष पदी महादेव वैराळ तथा जिल्हा कोषाध्यक्ष पदी चंद्रकांत खरात व जिल्हा संघटक पदी लहू वीर सर यांची नियुक्ती करण्यात आली.

महत्वाचे- लवकरच अर्जुन भाऊ खोतकर साहेब यांच्या उपस्थितीमध्ये अंबड व घनसावंगी तालुका कार्यकारणी करण्यात येणार आहे.असा निर्धार सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केला.यावेळी शिक्षक सेना जिल्हा कार्याध्यक्ष विनायक राठोड.तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर वाघमारे. शिक्षण सेना जालना तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर वाघमारे. घनसांगी तालुका अध्यक्ष गोरखनाथ पवार.जालना तालुका उपाध्यक्ष गणेश खरात.जालना तालुका सचिव परमेश्वर डिखूळे, बेवले सर.वीर सर.मिसाळ सर. हनुमान मुंजाळ.विनोद राठोड यांची उपस्थिती होती.



# ओबीसी आरक्षण संपविण्याचे षडयंत्र; शासनावर सकल ओबीसी समाजाचा गंभीर आरोप

## मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाविरोधात तीव्र आक्रोश

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी (दै.महाभारत)

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातील आरक्षण देण्याच्या राज्य शासनाच्या हालचालींवरून ओबीसी समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. भारतीय संविधानाच्या १०२ व्या घटनादुरुस्तीनुसार सामाजिक, आर्थिक, राजकीय मागासवर्ग ठरविण्याचा अधिकार हा राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला आहे. मात्र महाराष्ट्रातील खुल्या जातीला सामाजिक मागास ठरविण्याचा अधिकार राज्य मागासवर्ग आयोग किंवा राज्य शासनाला नाही, असे स्पष्ट करून सकल ओबीसी समाजाचे समन्वयक ड. महादेव आंधळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर ओबीसी आरक्षण संपविण्याचे षडयंत्र रचत आहेत असा गंभीर आरोप पत्रकार परिषदेत केला. या पत्रकार परिषदेला विलास ढगारे, अरुण भालेकर, महेश निनाळे, रामभाऊ पेरकर, विष्णू वखरे, बबनराव पवार, शरद बोरसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईत मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाने मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा विरोध दर्शविला आहे. आंधळे म्हणाले, माजी न्यायमूर्ती शिंदे समितीला केवळ दस्तावेज तपासण्याचे अधिकार होते. मात्र, राज्य शासनाने त्याच्या आधारावर जात प्रमाणपत्रांचे वाटप केले. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर बनावट कागदपत्रे वापरून खोटी कुणबी जात प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. खुल्या, एसईबीसी आणि ओबीसी अशा तिन्ही प्रवर्गातून मराठा समाज आरक्षणाचा फायदा घेत आहे. प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात प्रबळ असलेल्या मराठा समाजाला आरक्षण मागण्याचा अधिकार नाही.

त्यांनी पुढे सांगितले की, ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के असली तरी इंद्र सहानी प्रकरणामुळे केवळ २७ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील साडेतीनशे जातींना या प्रवर्गात स्थान मिळाले आहे. अशा परिस्थितीत शासन दबावाखाली येऊन खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रकार ओबीसी समाजासाठी अन्यायकारक आहे.

पत्रकार परिषदेत ओबीसी समाज समन्वयकांनी ठाम भूमिका घेतली की, शिंदे समितीच्या माध्यमातून दिलेली सर्व खोटी कुणबी जात प्रमाणपत्रे त्वरित रद्द करण्यात यावीत. तसेच, कुणबी किंवा मराठा कुणबी जातीचे दाखले मिळविणाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षणास अपात्र ठरवावे. सर्वोच्च न्यायालयाच्या जयश्री पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणातील निर्णयानुसार मराठा समाज आरक्षणासाठी अपात्र आहे. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने त्वरित करावी.

महेश निनाळे यांनीही स्पष्ट इशारा दिला की, सध्याचे आंदोलन दडपशाही आणि बळाच्या जोरावर चालवले जात आहे. राज्य सरकारने ओबीसी समाजाच्या हिताविरोधात निर्णय घेतल्यास आम्ही ठाम आणि योग्य भूमिका घेऊ, असे सांगत ओबीसी महासंघाच्या सुरू असलेल्या आंदोलनाला सकल ओबीसी समाजाचा जाहीर पाठिंबा देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# पंचशील गोरेगाव विभाग वर्षावास मालिकेचे आठवे पुष्प आंबर्ले येथे संपन्न

## बौद्ध धम्म म्हणजे विज्ञान या विषयावर

प्रवचनकार रूपेश गमरे यांचे प्रवचन

बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड ) पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभाग व बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रं ८४१ आणि पंचशील महिला सेवा संघ गोरेगाव विभाग यांचे संयुक्त विद्यमाने वर्षावास मालिकेचे आठवे प्रवचन मौजे आंबर्ले येथे ३० ऑगस्ट, २०२५ रोजी संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रमणी साळवी होते. संस्थेचे अध्यक्ष विकासदादा गायकवाड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना प्रमुख वक्ते रूपेश गमरे यांचे कौतुक करताना काही महिन्यापूर्वी त्यांच्या मुलीचे अपघाती निधन झाले. परंतु तथागत भगवान गौतम बुद्धाच्या विचाराने वाटचाल करणाऱ्या आयु. रूपेश गमरे यांनी दुःखाचे निवारण करून जीवनाचा मार्गक्रम करावा अशी आमची सर्वांची मैत्री भावना होती. आज ते प्रसंगाला सामोरे जात असताना धम्म प्रचारक करीत आहेत. त्यांच्या सोबत धम्म प्रचारक संदीप महाडिक आहेत. गोरेगाव विभागाची दोन रत्न आहेत. समाजाने त्यांना जपावं असे सांगितले.

कार्यक्रमाचे नियोजन आदर्श बौद्ध विकास मंडळाने केले. अध्यक्ष राजेंद्र शिंदे, सुनील शिंदे, प्रकाश शिंदे, धम्म प्रचारक संदीप महाडिक, सुधीर शिंदे, रवींद्र शिंदे, नामदेव शिंदे, अभिजित शिंदे, सुदेश शिंदे स्थानिक व मुंबई प्रदेश समितीचे पदाधिकारी व रमाई महिला मंडळ यांनी केले.



कै. दलीत मित्र चंद्रकांत अधिकारी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रूपेश गमरे यांनी आढावे पुष्प गुंफले. बौद्धधम्म सत्याचा स्वीकार करतो. काळानुरूप बदल स्वीकारले जातात. हे फक्त बौद्ध धम्मात आहे. इतर धर्मात बदल करता येत नाही. वक्ते म्हणतात, पूर्वी लोक पृथ्वी स्थिर आहे अस म्हणत होते. सूर्य उगवतो व मावळतो असे म्हणत.कालांतराने पृथ्वी स्वतः भोवती फिरते. चंद्र, सूर्य स्थिर आहे याचा शोध लागला. हा बदल विज्ञानवादी बौद्ध धम्म स्वीकारतो. ईश्वर दिसला तर आहे. दिसत नाही तर नाही. आत्मा दिसला तर आहे. दिसत नाही तर नाही. सुख आहे म्हणून दुःख आहे. दुःखाचे निवारण करता येत. वक्ते स्वतः विद्यानांचे शिक्षक असल्याने त्यांनी अनेक उदाहरण दिली. बौद्धधम्म वास्तववादी आहे.

माणसाची पाच इंद्रिय जाणतात ते सत्य आहे. बौद्ध धम्म प्रज्ञा, शील, करुणेवर आधारित असलेला धम्म महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. जागतिक विद्वानाने २१ वर्ष जगातील इतर धर्मांचा अभ्यास करून बौद्ध धम्म दिला. जगातील बहुसंख्य बलाढ्य देश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे स्वागत करीत आहेत.

पंचशील महिला संघाच्या अध्यक्ष सुप्रिया साळवी, उपाध्यक्ष सुवर्णा हाटे, रेश्मा संदीप साळवी, विजया विकास गायकवाड,

पंचशीलचे कार्यकर्ते तुकाराम लोखंडे, मांगरूळ,शरद मोरे, संदेश मोरे, चिंतामण गायकवाड, विजय जाधव, रामदास जाधव, बळीराम हाटे वडगाव, हिरामण महाडिक, वडघर,सुरेश अहिरे देवळी, निलेश महाडिक उणेगाव, जनार्दन जाधव, निखिल लोखंडे, हरीभाऊ हाटे, विजय मोरे, सुरेश जाधव, श्रीकांत साळवी, उपस्थित होते.

संघाच्या कार्यकर्त्या राजश्री साळवी, योजना शिंदे, जयश्री सोनवणे, सुनंदा गंगाराम मोरे, अपर्णा लोखंडे, संजना गायकवाड, भारती साळवी, रोहित राजन लोखंडे, प्रिया लोखंडे, समीक्षा सचिन महाडिक, विद्या हिरामण महाडिक, आंबर्ले येथील नैना नरेश शिंदे, सविता सुरेश शिंदे, राजश्री मोरे, भारती मोरे वडघर, सुनंदा यशवंत लोखंडे, दीपाली दिलीप मोरे या महिला मोठ्या संखेने हजर होत्या.

आंबर्ले संघाचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे, आयु. संदीप साळवी, आयु. संदीप महाडिक, यांनी मनोगत व्यक्त केले. आयु. राजू मोरे, सर यांनी २२ प्रतिक्रिया दिल्या. त्यानंतर धम्मदान दिले.नेते वक्त्याने.संघाला दान केले. रमाई महिला मंडळ व युवा मंडळ, ग्रामस्थ यांनी भोजन दान देवून कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुंबई नाका सर्कल वर नंदिनी नदीकाठावर 'कालबाह्य' स्फोटके

## एक हजार जिलेटीन कांड्या बेवारस; सूत्रधाराचा शोध सुरु

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक-: भू-सुरुंग व तत्सम स्फोटासाठी वापरण्यात येणाऱ्या जिलेटीनच्या तब्बल एक हजाराहून जास्त कांड्या मुंबई नाका सर्कल वरील नंदिनी नदीकाठावर रविवारी संशयास्पदरित्या बेवारस आढळल्या आहे

मुंबई नाका पोलिसांनी बॉम्बशोधक व नाशकपथक आणि गुन्हे शोधपथकासह मुंबईनाका पोलिसांनी बेवारस जिलेटीन कांड्यांची तपासणी केली. त्यानंतर त्या कांड्या 'कालबाह्य' असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. दरम्यान, या कांड्या कोणी व का बेवारस फेकल्या? याचा तपास पोलिसांनी सुरु केला आहे. तांत्रिक



विश्लेषणानुसार संशयिताचा माग काढला जात आहे.

रविवारी (दि.३१) दुपारी साडेतीन ते पावणेचारच्या सुमारास भाभानगर परिसरातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृहामागील बाजूस नंदिनी नदीकाठावर संशयास्पदरित्या पांढऱ्या रंगाच्या चार प्लास्टिक गोण्यांत जिलेटीन कांड्या अस्ताव्यस्त असल्याची माहिती शहर नियंत्रण कक्षात प्राप्त झाली. त्यानुसार मुंबई नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संतोष नरूटे यांच्यासह गुन्हे शोधपथक घटनास्थळी दाखल झाले. त्या गोण्यांत जिलेटीन कांड्या असल्याचे दिसताच बॉम्बशोधक व नाशक पथकासह बी बी डी एस श्वानपथक यानां पाचारण करण्यात आले तपासणी पूर्ण झाल्यावर संबंधित जिलेटीन कांड्या कालबाह्य असल्याचे पथकाने स्पष्ट केले. गणेशोत्सवाचा जल्लोष वाढत असताना भरवस्तीत या स्वरूपाचे घातक व स्फोटक पदार्थ आढळल्याने शहरात दुपारनंतर एकच खळबळ उडाली. काहींनी या जिलेटीनचे लाईव्ह चित्रण करुन सोशल मिडियावर रिल्स अपलोड केल्याचे आढळून आले. पोलिसांनीही तातडीने धाव घेऊन परिस्थिती नियंत्रित केली. मात्र, सणोत्सवात हे विघातक कृत्य करण्याचा डाव आखणारे किंवा अजाणतेपणातून हे कृत्य करणाऱ्यांचा माग आता पोलीस काढत आहेत. संबंधित संशयितांना ताब्यात घेण्यासह आवश्यक कारवाईस प्रारंभ झाला आहे.

दरम्यान, जिलेटीन कांड्या स्फोटक असून त्यांचा वापर विशेषतः खाणकाम, विहिरी खणणे, डोंगर व रस्ते किंवा इतर कामांदरम्यान अडथळा ठरणारे मोठमोठे दगड किंवा खडक फोडण्यासाठी केला जातो. यात मोठे छिद्र करून त्यात कांड्या ठेवल्या जातात, त्यानंतर लांबून (लांब अंतरावरुन) वात पेटवून स्फोट घडवून आणला जातो. कांड्यांचा स्फोट होऊन दुर्घटनाही घडल्या यात अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. कधीकधी विकृत प्रवृत्तीचे लोक जाणून बुजून या कांड्यांचा वापर करून विध्वंस घडवतात, असेही समोर आले आहे.

# कोल्हापुरमध्ये गणेशोत्सवात प्रेशर मिड गॅस वापरास बंदी,:जिल्हादंडाधिकारी....

कोल्हापूर / प्रकाश कांबरे
(दै.महाभारत)

कोल्हापूर : भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) मध्ये जेथे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या अधिसूचनेनुसार कोल्हापूर जिल्हयामध्ये नागरिकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव प्रेशर मिड व उज२ गॅस वापरास बंदी आदेश ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत जारी केला आहे. दिनांक २७ ऑगस्ट २०२५ ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा होत आहे.

जिल्ह्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांकडून मोठ्या प्रमाणावर मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या मिरवणुकांमध्ये काही मंडळांकडून प्रेशर मिड (झीर्शीीीीश चळव) व उज२ गॅसचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे मिरवणूक बघण्यासाठी जमलेल्या नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण होत आहे. विशेषतः मानवी श्वसन संस्थेला



हानी, हृदय, कान व डोळ्यांवर दुष्परिणाम, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मिरवणुकांमध्ये प्रेशर मिड (झीर्शीीीीश चळव) व उज२ गॅसचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे असे बंदी आदेशात जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

# येणाऱ्या शंभर दिवसात प्लास्टिक मुक्तीचे आदर्श मॉडेल तयार करुया - जिल्हाधिकारी अमोल येडगे



## कापडी पिशवी 'अपमान' नाही तर 'अभिमान'

कोल्हापूर/प्रकाश कांबरे
(दै. महाभारत)

कोल्हापूर : प्रत्येकाच्या घरापासून जागतिक स्तरावर वाढलेल्या प्लास्टिकच्या अतिवापरामुळे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी येणाऱ्या शंभर दिवसात कोल्हापुरातून प्लास्टिक मुक्तीचे आदर्श मॉडेल तयार करूया असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. त्यांनी केलेल्या आवाहनानुसार जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, स्वयंसेवी संस्था तसेच पर्यावरण तज्ज्ञांच्या उपस्थितीत प्लास्टिक बंदी अभियान राबविण्यासाठी नियोजन आणि विचारमंथन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणावर परिणाम करीत आज मनुष्याच्या शरीरातही मायक्रोप्लास्टिक आढळून येत आहे. अनेक सार्वजनिक पाण्याचे स्रोत, नद्या, नाले, जमीन प्लास्टिकमुळे प्रदूषित झाली आहे. यासाठी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून २५ ऑगस्ट ते ३ डिसेंबर २०२५ या कालावधीत १०० दिवस प्लॅस्टिक मुक्ती अभियान राबवण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत '१०० दिवसात प्लास्टिक दूर.. नक्की करणार आमचं कोल्हापूर' या टॅग लाईनचा प्रचार, प्रसार करण्यात येणार असून या प्लास्टिक बंदी अभियानाचा शुभारंभ नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती ताराराणी सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा सह आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्यासह जिल्हास्तरीय सर्व शासकीय विभागांचे प्रमुख, पर्यावरण तज्ज्ञ, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले, प्लास्टिक बंदी प्रभावीपणे लागू करून पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम दूर होऊ शकतात. प्लास्टिक हे बायोडिग्रेडेबल नसल्यामुळे जमीन, नद्या, समुद्र आणि हवेत प्रदूषण वाढवते. मायक्रोप्लास्टिक्स अन्नसाखळीत प्रवेश करून मानवी आरोग्यालाही धोका निर्माण करतात, ज्यामुळे जैवविविधता कमी होते आणि पर्यावरणीय संतुलन बिघडते.

कोल्हापूर जिल्ह्यात प्लास्टिक बंदी अभियान ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांची कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, क्रीडा संस्था, माध्यमे, मंदिरे, उद्योजक, व्यापरी, हॉटेल, फेरीवाले, विविध संस्था, संघटना, विविध गट, बचतगट, केटरींग, व्यावसायिक, फेरीवाले संघटना, एमआयडीसी, किरकोळ फळ-फुले-भाजीपाला विक्रेते आदींच्या सहभागातून राबवण्यात येणार आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आता एक्शन मोडवर या उपक्रमात सहभागी होतील. प्लास्टिक मुक्त कुटुंब अभियान शाळेतून सुरू होणार. प्रत्येक संस्था, पर्यावरण प्रेमी यांनी दिलेल्या सूचनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी ग्रामीण भागात प्लास्टिकचा वापर वाढलेला असून प्लास्टिक बंदी साठी आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या व आपल्या पुढील पिढी साठी या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभाग घ्यावा. कोल्हापूरकर नेहमीच आपल्या कामातून इतरांना प्रेरणा देतात असेही ते म्हणाले. बैठकीच्या शेवटी प्लास्टिक बंदीची शपथ उपस्थितांनी घेतली. स्टील बँक सुरु केल्याबद्दल विदुला स्वामी यांचे कौतुक जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

उत्पादनावर बंदी, ग्राहकांच्या प्लास्टिक वापरावरही निर्बंध, दंडात्मक कारवाईची मागणी..

उपस्थित मान्यवरांनी यावेळी विविध विषयांतून प्लास्टिक बंदी साठी सूचना दिल्या. यात संजय शेट्टे, राहुल मगदूम, विदुला स्वामी, दिलीप पोवार, उदय गायकवाड, संजीव चिपळूणकर, आदिनी विविध सूचना मांडल्या. प्लास्टिक बंदीला पर्याय म्हणून बायोडिग्रेडेबल सामग्रीचा वापर, पुनर्वापराला प्रोत्साहन आणि जनजागृती मोहिमा यामुळे हे परिणाम कमी करता येऊ शकतात. प्रशासन, पर्यावरण प्रेमी, उद्योग आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. जिल्ह्यात ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक उत्पादन करणाऱ्या कंपन्या शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. विक्रेत्यासह आता प्लास्टिक पिशवी घेणारा ग्राहकही कारवाईच्या कक्षेत यावा व त्यांच्यावरही दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी बैठकीत करण्यात आली. तसेच इचलकरंजी येथील कापड उद्योगांनी कापडी पिशव्यांच्या निर्मितीसाठी पुढाकार घेऊन प्लास्टिक बंदी उपक्रमात सहभागी व्हावे.

कापडी पिशवी 'अपमान' नाही तर 'अभिमान'..

ज्याप्रमाणे चहासाठी प्लास्टिक कपांचा वापर बंद झाला आहे. त्याचप्रमाणे इतर ठिकाणीही आता प्लास्टिक पिशवी बंद करण्यासाठी १०० टक्के नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. प्लास्टिक कपातून चहा पिल्याने आरोग्यास धोका आहे ही बाब प्रत्येकाला पटली. तशीच परिस्थिती प्लास्टिक पिशवीसाठी देखील घडावी. यासाठी प्रत्येकाने सोबत तसेच खिशात, गाडीच्या डिक्कीत कापडी पिशवी ठेवावी अशी सूचना करण्यात आली. कापडी पिशवी सोबत असणे कमीपणाचे लक्षण नाही, तो अपमान नाही तर तो सन्मान आणि अभिमान वाटवा. या एका लहान बाबीमुळे प्लास्टिकचा वापर निम्म्यापर्यंत कमी होईल. याच बरोबर आपल्या वाहनातील प्लास्टिक बाटल्यांची जागा स्टील बॉटलने घ्यावी असे आवाहन करण्यात आले.



# रेल्वे स्टेशन परिसरात लहान मुलीवर बलात्काराचा संतापजनक प्रकार

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळी शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात अवघ्या पाच वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कारासारखी अमानुष घटना घडली असून, संपूर्ण शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेविरोधात सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांनी परळी शहर पोलीस स्टेशनला धाव घेऊन निवेदन सादर केले.

या निवेदनात संबंधित नराधमावर कठोरात कठोर कारवाई करून त्याला आदर्श शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. निर्दोष बालिकेवर झालेला हा पाशवी अत्याचार हा मानवीयतेलाच काळीमा फासणारा असून, अशा गुन्हेगारांना समाजात जागा नसल्याचे स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, न्यायालयीन प्रक्रियेत वेग आणून आरोपीस कठोर शासन व्हावे, अशी मागणी केली. शहरातील नागरिकांमध्ये या घटनेमुळे भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, यापुढे अशा घटना घडू नयेत म्हणून पोलिसांनी सतर्कतेने काम करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# सावाना व नागरिक शिक्षक गौरव समितीचे शिक्षक पुरस्कार जाहीर

## ११ सप्टेंबर रोजी उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते होणार गौरव

निफाड /रामभाऊ आवारे

सार्वजनिक वाचनालय नाशिक आणि नागरिक शिक्षक गौरव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या शिक्षक गौरव पुरस्कारांची घोषणा सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, शिक्षक गौरव समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.किशोर पवार, उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांनी शनिवारी सभेत जाहीर केले.

वाचनालायाकडे आणि नागरिक शिक्षक गौरव समितीकडे आलेल्या विविध प्रस्तावातून निवड समितीने निवड केलेल्या पुरस्कारार्थींची नवे उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांनी सभेपुढे वाचून दाखवली. सर्व निवड करण्यात आलेल्या आदर्श शिक्षकांचा गौरव ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता राज्याचे उद्योग मंत्री व मराठी भाषा मंत्री ना. उदय सामंत यांच्या शुभ हस्ते व वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांच्या अध्यक्षतेखाली सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून करण्यात येणार आहे.या शिक्षकांचा होणार शिक्षक पुरस्कार गौरव प्राथमिक विभाग (मनपा) - योगेश महारु सूर्यवंशी (शाळा क्र. २७, अशोक नगर), अविनाश नामदेव पवार (शाळा क्र. ४६ उपनगर),

प्राथमिक विभाग (खासगी) - सौ. अनुराधा उत्तमराव बस्ते (सरस्वती विद्यालय), सौ. ज्योती वालझाडे (बालक मंदिर, मराठी माध्यम), माध्यमिक विभाग सौ. शामल योगेंद्र पाटील (सरडा कन्या विद्यालय), सौ. कनकलता साकोरीकर (आरपी विद्यालय), विनीत धर्मराज पवार (जनता विद्यालय, सातपूर), सौ. वैशाली विशाल मुळे (विद्याप्रबोधिनी प्रशाला)

मुख्याध्यापक - संजय निवृत्ती डेर्ले (सी एम विद्यालय, मखमलाबाद), सेवा निवृत्त माध्यमिक मुख्याध्यापक - सौ. कुंदा जोशी (सिडीओ मेरी हायस्कूल) ,सेवा निवृत्त प्राथमिक मुख्याध्यापक - अनुराधा माधव नामजोशी (शिशु विहार बालक मंदिर), महाविद्यालयीन - नागेश्वर राघव भदाणे (प्राचार्य के.टी.एच एम), व्यावसायिक - द्विवेदी अरुणकुमार ओमकारनाथ, संशोधक सुनीता हनुमंत पाटील, विज्ञान - डॉ. प्रमोद हिरे (एच पी टी महाविद्यालय), संत साहित्य - डॉ. गजानन वामनराव आंभोरे, विशेष कार्य - श्री. नार्वेकर, डॉ. गंधार मंडलिक,

लोककला - श्रीकांत श्रावण गायकवाड, शास्त्रीय संगीत - आनंद अत्रे, चित्रकला - श्री. समीर शरदचंद्र कुलकर्णी, क्रीडा - कैलास पांडुरंग लवांड (के.टी.एच एम)ड़,उच्च माध्यमिक - सौ. छाया अरुण लोखंडे (बी.वाय. के. कॉलेज), कला माध्यमिक - मनीष जोगळेकर (पेठे हायस्कूल), महाविद्यालयीन- प्रा. सोमनाथ तुकाराम घुले (के.एस.के., सिडको), प्रा. घनश्याम बाळकृष्ण जाधव (फार्मसी कॉलेज, गंगापूर रोड), प्रा. संध्या मिलिंद खेडेकर (एस एम आर के कॉलेज), यावेळी समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.आभार सुरेश गायधनी यांनी मानले.

# कंधार येथे उपविभागीय कार्यालयावर अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचा मोर्चा धडकणार- मा.आ.शंकरअण्णा धोंडगे

कंधार । धोंडीबा मुंडे
(दै.महाभारत)

कंधार लोहा विधानसभा मतदारसंघामध्ये दि.२८ व २९ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसाने थैमान घातल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.राज्य आणि केंद्र शासनाकडून तातडीची मदत मिळवून देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाची लोकप्रतिनिधी केवळ पाहणीचे सोंग करण्याचे नाटक करीत आहेत.सरकारच्या शेतकरी विरोधी नकारात्मक धोरणाचा निषेध करण्यासाठी व बाधित शेतकऱ्यांना तात्काळ सरकारकडून मदत देण्यात यावी यासाठी कंधार उपविभागीय कार्यालयावर आज दि.३ सप्टेंबर रोजी धडक मोर्चा काढणार असल्याची माहिती माजी आ.शंकर अण्णा धोंडगे यांनी पत्रकार परिषदेत दिली,



ढगफुटी सदृश पावसामुसामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. कंधार-लोहा तालुक्यातील शेतकरी मोठया प्रमाणात आर्थिक संकटात सापडला आहे. राज्य आणि केंद्र शासनाकडून तातडीची मदत देत नाही. सरकारच्या शेतकरी विरोधी नकारात्मक धोरणाचा निषेध करण्यासाठी व बाधित शेतकऱ्यांना तात्काळ सरकारकडून मदत देण्यात यावी यासाठी कंधार उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा दि.३ सप्टेंबर बुधवारी रोजी ११ वाजता महाराष्ट्र राज्य समितीच्या वतीने धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे असे समितीचे अध्यक्ष माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी सांगितले. यावेळी दत्ता पवार,शफीउल्ला बेग, शिवराज धोंडगे,सुभाष मोरे, अशोक सोनवळे,राजू पाटील पांगरेकर, संतोष कागणे उपस्थित होते.

काही दिवसांपूर्वी कंधार व लोहा तालुक्यात मुसळधार व ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी होऊन खरिपातील मूग उडीद, सोयाबीन ज्वारी, तूर हळद कापूस ऊस या प्रमुख पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले. नदी नाल्या काठच्या जमिनी खरडून गेल्या गुरे ढोरे शेकडोने वाहून गेले. अनेक गावांना पुराचा फटका बसला. गावागावात घरांची पडझड झाली अनेक घरात पुराचे पाणी घुसल्यामुळे संसार उपयोगी वस्तू नष्ट झाल्या. एवढी मोठी अतिवृष्टी १९८३ झाली होती. ४२ वर्षा नंतर मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळला आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधींनी तातडीने नुकसान भरपाईसाठी सरकारवर दबाव आणण्याऐवजी पाहणीचे सोंगडोग व फोटोसेशन करण्यात लोकप्रतिनिधी गुंग आहेत.

# लिंबागणेश येथे रास्ता रोको ; मनोजदादा जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा आंदोलनाची धग वाढली:-डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सरकार मराठा आरक्षणाच्या मागण्या पूर्ण करत नसल्याने मनोजदादा जरांगे पाटलांनी आजपासून पाणी त्याग करून कडक उपोषणाला सुरुवात केली. त्यामुळे आंदोलनाची धग अधिक वाढली आहे.

त्याच धर्तीवर बीड तालुक्यातील अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग (क्र. ५४८ डी) वरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान, लिंबागणेश येथे मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१ सोमवार रोजी सकाळी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. बहुजन समाजातील बांधवांनी जरांगे पाटलांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शविला व मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी केली.

निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पद्माकर आहेर,सपो.लक्ष्मण बीडकर, बाबासाहेब राख, गोविंद बडे पोह.प्रशांत क्षीरसागर, सतिश राऊत, अविनाश घुंगरट, विशाल क्षीरसागर, बाळासाहेब ढाकणे, विशाल कदम,महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी महादेव जायभाये, तलाठी गणपत पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक बीड यांना देण्यात आले. यावेळी मुळकुवाडीचे सरपंच रामकिसन कदम, धनगर समाजाचे नेते कृष्णा पितळे आदींची भाषणे झाली.आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.मात्र यावेळी रूग्णवाहिकेला मोकळी वाट करून देण्यात आली. यावेळी आंदोलनात लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा समाजा बरोबरच गावगाड्यातील




बहुजण समाजातील बांधवांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, पोखरीघाटचे सरपंच बाबासाहेब मुळीक, अंजनवतीचे सरपंच सुनिल येडे, मेंगडेवाडीचे ज्ञानेश्वर मेंगडे, प्रशांत कदम, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, औदुंबर नाईकवाडे, सुंदरराव जाधव, पांडुरंग वाणी, गणपत तागड,समीर शेख,अशोक वाणी,अक्षय येडे ,संजय घोलप,अजय थोरात,आदी सहभागी होते

सरकारने न्यायालयाचा हवाला देत मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. यावर तोडगा म्हणून जरांगे पाटलांनी सरसकट हा शब्द वगळत, ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा व कुणबी एकच असल्याने तातडीने अध्यादेश काढावा, असा पर्याय दिला आहे.

सरकारकडे आता कोणतेही कारण शिल्लक नाही. गरजवंत मराठ्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहू नये, तातडीने आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली.

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com
* टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# पाणी बचत करणे काळाची गरज - संजयबाबा घाटगे

## अन्नपुर्णा पाणी पुरवठा संस्थेची ३३ वी वार्षिक सभा : १८ लाख २५ हजारांचा निव्वळ नफा

कुडूत्री / प्रतिनिधी (दै.महाभारत)

पाणी बचत केली तर वीज बचत होईल, त्यातून संस्थेचा आणि शेतकऱ्यांचा दोघांचाही फायदा होणार आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची खरी गरज आहे, असे प्रतिपादन अन्नपुर्णा सहकारी पाणी पुरवठा संस्थेचे संस्थापक चेअरमन संजयबाबा घाटगे यांनी केले.

व्हनाळी येथे झालेल्या संस्थेच्या ३३ व्या वार्षिक सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या वेळी गोकुळचे संचालक अंबरिषसिंह घाटगे प्रमुख उपस्थित होते.

संजयबाबा घाटगे म्हणाले, गेल्या तीस वर्षांत संस्थेने अनेक चढउतार अनुभवले, मात्र प्रामाणिक शेतकरी सभासद, सेवकवर्ग आणि संचालक मंडळ यांच्या योगदानातून संस्थेने सातत्याने प्रगती केली आहे. शेतकरी सभासदांची आर्थिक उन्नती हेच ब्रिद ठेवून काम केले असून आतापर्यंत साडेचार हजार एकर शेती ओलीताखाली आणण्यात संस्थेला यश आले आहे. पाणी बचतीसाठी पोटलाईन




घालण्यात आली असून सचिव व कर्मचारी यांच्या योग्य नियोजनामुळे भविष्यातही ही योजना आदर्शवत चालेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तज्ञ संचालकपदी निवड झाल्याबद्दल संजयबाबा घाटगे यांचा जेष्ठ सभासदांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पाणीपट्टीचे दर पुर्ववत केल्याबद्दल पाटबंधारे मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव करून त्यांना उपस्थितांनी टाळ्यांनी दाद दिली.


अंबरिषसिंह घाटगे यांनी काळामावाडी दुधगंगा धरणातील गळती प्रतिबंधक उपाययोजना व दुरुस्ती कामाची माहिती दिली. तसेच पाणी नियोजनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हैसदुध उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न करावेत, त्यासाठी गोकुळमार्फत सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. अन्नपुर्णा शुगरचे शेती अधिकारी श्रीनिवास कुलकर्णी यांनी ऊस विकास योजनेबाबत माहिती देऊन खोडवा उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या सभेत मुख्य सचिव आकाराम बचाटे यांनी अहवाल वाचन केले. संस्थेला यावर्षी अडिट वर्ग 'अ' मिळाला असून १८ लाख २५ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाल्याचे त्यांनी सांगितले. सभेचे स्वागत संचालक धोंडिराम एकशिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सागर लोहार यांनी केले तर के.बी. वाडकर यांनी आभार मानले. सभेच्या समारोपावेळी राष्ट्रगीत झाले. या वेळी उपाध्यक्ष विष्णूपंत गायकवाड, संचालक विलास पाटील, साताप्पा तांबेकर, अशोक पाटील, पंडित दंडवते, आनंदा तळेकर, संजय सुतार, एम.टी. पोवार, सुरेश मर्दाने,किरण पाटील, विलास कौंदाडे, सरपंच दिलीप कडवे, मॅनेजर रघुनाथ पाटील यांच्यासह सर्व सभासद उपस्थित होते.



## जिल्हा कचेरी समोरील बेमुदत धरणे आंदोलनकारी जयसिंग वीर प्रकृती बिघडली

बीड / प्रतिनिधी (दै.महाभारत)

करचुंडी येथील गायरान, हक्काचा सातबारा व विविध मागण्या साठी जिल्हा कचेरी समोर गेल्या पंधरा दिवसापासून गावकऱ्यांसह आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांची प्रकृती खालावली आहे. गायरान धारकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक दिवसापासून आंदोलन करत आहेत.१५ व्या दिवशी त्यांची प्रकृती बिघडल्याने पोलीस प्रशासनाने म्बुलन्स बोलवून त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी रुग्णालयातून सांगितले आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आपले बेमुदत धरणे आंदोलन चालू राहणार आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आपण या बेमुदत धरने आंदोलनातून माघार घेणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका त्यांनी उपचारादरम्यान बेडवरून स्पष्ट केली आहे. जीव जरी गेला तरी आता या आंदोलनातून माघार नाही असं त्यांनी सांगितला आहे.



## अमीर बाबा दर्गा चे अनेक वर्ष सेवाकरनारे खिरणा बाई चव्हाण याचे दुःखद निधन

चकलंबा /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलंबा येथील हजरत अमीर शहा कादरी दर्गा यांची सेवा करणारी खीरनाबाई यांचे दुःख त निधन झाले त्यांनी वीस ते पंचवीस वर्ष दर्गा ची सेवा केली. त्या सर्वांच्या आत्या होत्या त्यांना सर्वजण फुफु असं मनत सर्वांशी मनमिळाऊ स्वभाव कधीही कुणाला वापस बोलत नसेल कधीही कुणाला रागवत नसत त्यांच्या जाण्याने चकल्यांब्यात परिसरात हळहळ व्यक्त होत आहेत.त्यांची निधनाची वार्ता समजताच अनेकांना धक्काच बसला त्यांच्या अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता त्यांच्या पश्चात दोन मुले सुना नातवंड असा त्यांचा परिवार आहे त्यांच्या दुःखात

# प्रभाग रचनेतील अन्यायकारक बदलांविरोधात बोंडेगाववासीयांचा संताप :

## मतदानावर बहिष्काराचा इशारा

ब्रम्हपुरी /प्रतिनिधी (दै.महाभारत)

ब्रम्हपुरी नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग रचनेत करण्यात आलेल्या बदलामुळे बोंडेगाव परिसरात तीव्र असंतोषाची लाट उसळली आहे. बोंडेगाव व बोंडेगाव हुडकी हे एकाच गावाचा भाग असूनही, हुडकी भागाला वेगळा करून प्रभाग क्रमांक ०६ मध्ये जबरदस्तीने समाविष्ट करण्यात आले आहे. या अन्यायकारक व सूडबुद्धीच्या कृत्रिम विभागणीला ग्रामस्थांनी विरोध दर्शविला असून, जर शासनाने व निवडणूक विभागाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर मतदानावर बहिष्कार टाकण्याचा ठाम निर्णय बोंडेगाववासीयांनी घेतला आहे.

बोंडेगाव वार्डवासीयांचे म्हणणे आहे की, हा प्रकार केवळ तांत्रिक चूक नसून सत्ताधारी गटातील काही राजकारण्यांचा कुटील डाव आहे. जवळच्या उमेदवारांना संभ्रमात टाकून व सोयीस्कर पद्धतीने स्वतःच्या



उमेदवारांना विजय मिळवून देण्यासाठी ही प्रभाग रचना जाणीवपूर्वक अशा पद्धतीने केली गेली आहे.

बोंडेगाववासीयांनी आरोप केला की, सदोष प्रभाग रचनेत एकाच वार्डाचे दोन-तीन तुकडे करण्यात आले आहेत. बऱ्याच ठिकाणी एका वार्डातील काही घरे कृत्रिमरित्या वेगळी करून राष्ट्रीय महामार्गाच्या पलीकडील भागाशी जोडण्यात आली आहेत. प्रत्यक्षात शासकीय नियमांनुसार महामार्गाच्या पलीकडील भाग दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करणे निषिद्ध आहे. तरीदेखील या नियमांचे खुलेआम उल्लंघन करण्यात आले आहे.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, उत्तर- ईशान्य - पूर्व- पश्चिम- दक्षिण या दिशात्मक क्रमाने प्रभाग रचना करण्याची स्पष्ट तरतूद असताना, त्याकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय फायद्यासाठी वेगळ्या पद्धतीने प्रभाग रचना करण्यात आली आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा विश्वास ढासळण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

बोंडेगाववासीयांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, ही रचना म्हणजे अप्रत्यक्षपणे वोट चोरी करण्याचाच प्रकार आहे. सर्वसामान्य उमेदवारांना गोंधळात पाडून व मतदारसंख्या कृत्रिमपणे हलवून काही निवडक उमेदवारांना विजय मिळवून देण्याचा हा संगनमताने आखलेला कट आहे.निवेदन सादर करताना बोंडेगाव व आसपासचे अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यात हितेंद्र राऊत (शहर कॉंग्रेस अध्यक्ष), राजेश तलमले, गव्हर्नर रामटेके, चक्रेश करंबे, यांच्यासह गावातील ज्येष्ठ व युवा नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, जर शासन व निवडणूक विभागाने तातडीने प्रभाग रचनेत सुधारणा करून होणारा अन्याय दुरुस्त केला नाही, तर बोंडेगाव परिसरातील जनता मतदानावर बहिष्कार टाकेल. या इशाऱ्यामुळे नगरपरिषदेच्या निवडणूक प्रक्रियेबाबत प्रशासकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# खुलताबाद येथे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी खुलताबाद- फुलंब्री

## महामार्गावर रास्ता रोको आंदोलन आंदोलकांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला

खुलताबाद / बाबासाहेब दांडगे (दै. महाभारत)

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यासाठी संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ खुलताबाद तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने सोमवारी (दि.१) खुलताबाद- फुलंब्री महामार्गावरील काटशिवरीफाटा येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाच्या बापाच, मराठा समाजाला




आरक्षण मिळालेच पाहिजे यासह राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. व जो पर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आंदोलन तेवत ठेवणार असल्याचा इशारा समाज बांधवांनी दिला. यावेळी झालेल्या रास्ता रोको मुळे एक तास वाहतूक ठप्प झाली होती. विशेष म्हणजे खुलताबाद उरूसासाठी येणा-या यात्रेकरूंची गैरसोय झाली होती. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. यावेळी नायब तहसीलदार पांढरे यांनी निवेदन स्वीकारले .

## महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे, ग्राहक त्रस्त... महावितरण मस्त..

एका महिन्यात हजार वर लाईट बिल,,,,

कन्नड / निलेश पवार (दै.महाभारत)

महावितरणच्या गलथान कारभारामुळे सतत कमी-जास्त होणार्या वीज बिल समस्येमुळे दोन महिन्यांपासून मुंडवाडी गावातील परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्येमुळे परिसरातील अनेक घरांमध्ये पाण्याच्या मोटारी, पंखे, संगणक, टीव्ही व इतर इलेक्ट्रिकल वस्तूंचे मोठे चालावे कसे . या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी गावकरी यांच्या नेतृत्वाखालील नागरिकांच्या शिष्टमंडळाने महावितरणचे कार्यकारी अभियंता रविंद्र चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन देणार. यावेळी अभियंता रविंद्र चव्हाण यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेत दुरुस्तीसाठी कर्मचारी पाठवले असून लवकरच वीजपुरवठा मिटर करण्याचे आश्वासन कधी देणार




दिले आहे. मात्र, हा प्रश्न सुटला नाही तर तीव्र आंदोलन गावकरी करण्याचा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना सतत होणार्या कमी-जास्त होल्टेजमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. नागरिकांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा मिळणे आवश्यक असून, दररोज सकाळी या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विद्युत महावितरणने हा प्रश्न तात्काळ मार्गी न लावल्यास नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाणार आहे, असे गावकरी यांनी सांगितले.

# मातुळ येथील शेतकऱ्याच्या दोन एक्कर शेतातील कापुस गावगुंडांनी केले उपटून भुईसपाट

## पोटच्या गोळ्या समान समजल्या जाणाऱ्या पिकाचे नुकसान केल्याने गावात हळहळ व्यक्त विचारपुस करणाऱ्या फिर्यादी महिलेचेही विनयभंग ; सात जनाविरुद्ध भोकर पोलिसात गुन्हा दाखल


भोकर / अनिल डोईफोडे (दै.महाभारत)

तालुक्यातील मातुळ येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील दोन एक्कर शेतजमिनीवरील कमरेला आलेले उभे कापुस पिक गावातील व ईतर गावातील काही गावगुंड मिळुन उपटून भुईसपाट केले. विचारपूस करणाऱ्या फिर्यादी महिलेचा पदर धरून घरात ओढून नेवून विनयभंग केल्या प्रकरणी सात व ईतर काही आरोपीविरुद्ध भोकर पोलिसात विनयभंगासह विवीध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडीत शेतकऱ्याचे मोठ्याप्रमाणावर नुकसान केल्याने मातुळ गावात हळहळ व्यक्त होत आहे तर गावंगुंडाविरुध्द संताप व्यक्त केला जात आहे.

भोकर तालुक्यातील मातुळ येथील गट क्रमांक २४४ शेतजमिनीचे मालक शेतकरी आनंदा म्हैसाजी फुले ( ६० ) हा वयोवृद्ध शेतकरी आपल्यासह आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह फक्त शेतातील उत्पन्नाच्या माध्यमातूनच करतात.शेतात कबाड कष्ट करून चार पैसे गोळा करून आपल्या कुटुंबाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी आहे त्या जमिनीच्या तुकड्यात राब राब राबून काबाडकष्टामुळे डोलू लागलेले पिक काही जणांना ते पचनाशे झाले.दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री मातुळ व ईतर काही गावातील दहा ते पंधरा लोकांनी शेतात जबरिने येऊन दोन एक्कर पुर्ण शेत जमिनीवरील कमरेला आलेले कापसाचे पीक उपटून भुईसपाट केले.शेतकऱ्यांस आपल्या शेतातील कापुस उपटल्याची माहिती मिळताच शेतकरी डोक्याला हात लावून ढसा ढसा रडू लागला.हतबल झालेल्या शेतकऱ्यास कुटुंबीयांनी धीर दिला आणि आपल्या शेतातील कापूस उपटल्याविषयी विचारपुस केली असता

आदर्श अविनाश रामा फुले व आदर्श रामा फुले यांनी फिर्यादी महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ करित वीळा हातात घेऊन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.एव्हढ्यावरच न थांबता वाईट उद्देशाने महिलेचा पदर धरून घरात ओढून



नेले. गावातली घर शेजारील लोकांनी सोडवासोडव केल्याने पुढील अनर्थ टळला.

शेतात जाऊन पाहणी केली असता शेतातील पुर्ण एक एक्कर शेतजमिनीवर लावलेले कापुस जेकी कंबरेला आले होते ते मुळासगट उपटून भुईसपाट करुण अंदाजे १ लाख ५० हजार रूपयाचे नुकसान केल्याने गट क्रमांक २४४ मधील २ हेक्टर ३ आर चेशेतजमिन मालक आनंदा म्हैसाजी फुले यांची बहीण सुंदराबाई दत्ता फुले यांनी भोकर पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीवरून रामा विठ्ठल फुले, अविनाश रामा फुले, आदर्श रामा फुले, शिवराम करेवाड वरील सर्व राहणार मातूळ ता. भोकर जि. नांदेड, राहुल पवळे रा. बोरगाव किवळा ता. लोहा जि. नांदेड, प्रसाद मैसन्ना बुललू रा पुस्पुर मंडळ लोकेश्र्वरम जि. निर्मल, भिमराव मरिबा लोखंडे रा. तुराटी ता. उमरी जि. नांदेड वरील सात व ईतर काही गावंगुंडा विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४,१८९(२),३२४(४),३२४(५),२९६,३५१(२),३५१(३) प्रमाणे दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी रात्री विनयभंगासह विवीध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेच्या पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार हे करीत आहेत.

याच गावगुंडांनी मागिल एक महिन्यापूर्वी १९ जुलै रोजी या शेतकऱ्याच्या अखाड्यावरील पत्री शेड पाडून जबरी चोरी केली होती तेव्हा चोरीचा गुन्हा दाखल झाला होता तर विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागिल दोन दिवसाच्या अतिवृष्टने अनेकांच्या शेतातील पिके वाहुन गेल्याने आधीच शेतकरी हताश झाले यात सदरील पीडित शेतकऱ्याच्या तब्बल दोन एक्कर शेतातील कमरे इतके झालेले कापुस गावगुंडांनी उपटून भुईसपाट केल्याने हे नुकसान भरून न निघणारे आहे. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.झालेली नुकसान भरपाई करून देण्याची मागणी सदरील शेतकऱ्याकडून होत आहे.

दैनिक जय महाभारत

# सुगाव येथील मराठासेवक नितीन चव्हाण यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

## मराठासेवक नितीन चव्हाण यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही - राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

सुगाव येथील मराठासेवक नितीन माणिकराव चव्हाण यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ शनिवारी आत्महत्या केली. त्यांच्या पार्थिवावर सुगाव येथे रविवारी शोकाकुल वातावरणात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पिडीत कुटुंबाला सांत्वनपर भेट दिल्यानंतर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना देशमुख यांनी सांगितले की, मराठासेवक नितीन चव्हाण यांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलायला नको होते. नितीन यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे राजेसाहेब देशमुख म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांच्या सध्या मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनासंदर्भात केंद्र व राज्य सरकारची नकारात्मक भूमिका यामुळे लवकर तोडगा निघत नसल्याने व आमरण उपोषणामुळे दिवसेंदिवस मनोजदादा यांची प्रकृती ढासळत चालली असल्याचे टि.व्ही वर पाहून त्यांना अतिशय दु:ख झाले. तसेच सातत्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळत असलेली माहिती ऐकून त्यातून आलेल्या नैराश्यातून नितीन चव्हाण यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी घडली. नितीन चव्हाण या तरूणाने मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. रविवारी चव्हाण यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात व हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख, सरपंच बंडू शिंदे, उपसरपंच गणी खाँ पठाण, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सचिन शिंदे, व्हाईस चेअरमन नामदेव शिंदे, राजेभाऊ शिंदे, बलभीम शिंदे, रियाझ पटेल, शिवसेना (उबाठा) नेते मदनलाल परदेशी, दत्ता शिंदे, आस्तिक शिंदे,



बब्रुवान पांडे, महेश शिंदे, बबन पवार, भाऊसाहेब शिंदे, युसुफ पटेल, धनराज टिळक, किशोर कण्णाडोणे, युसुफ पठाण, रौफ भाई, नंदकिशोर चव्हाण, जमील पठाण, काकासाहेब आरसुळ, दयानंद शिंदे, किशोर टेकाळे, माणिक शिंदे, सुलेमान पठाण, आकाश भागवत यांच्यासह गांवकरी व पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते. मराठासेवक नितीन चव्हाण यांची आत्महत्या ही मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ झाली असल्याची माहिती चव्हाण कुटुंबियांच्या वतीने शासनाचे प्रतिनिधी अंबाजोगाईचे तहसीलदार, तलाठी व पोलीसांना देण्यात आलेली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, मराठा आरक्षणासाठी सर्वाधिक आत्महत्या या मराठवाड्यातच झाल्या आहेत. बीड व्यतिरिक्त मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी असे सात जिल्हे आहेत. मराठा आरक्षणासाठी सर्वाधिक आत्महत्या याच जिल्ह्यांमध्ये झालेल्या आहेत. मनोजदादा जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावातून मुंबई येथील आझाद मैदानावर पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू करण्याचा सरकारला इशारा आणि पुर्वसुचना दिली होती. त्यानुसार २९ ऑगस्ट २०२५ पासून 'मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण' द्यावे. या प्रमुख मागणीसाठी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे. मी व आमच्या सहकाऱ्यांनी संघर्षयोध्दा दादांची मुंबईत जावून भेट घेतली. आंदोलनात सहभागी होत पाठिंबा दिला आहे. दिवसेंदिवस संपूर्ण महाराष्ट्रातून या आंदोलनाला व्यापक, सर्वव्यापी व उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. असे असताना मराठासेवक नितीन माणिकराव चव्हाण यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या सध्या मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनातून लवकर तोडगा निघत नसल्याने हताश होऊन व सततच्या आमरण उपोषणांमुळे दिवसेंदिवस मनोजदादा यांची प्रकृती ढासळत चालली असल्याचे टि.व्ही वर पाहून त्यांना अतिशय दु:ख झाले. व यातून आलेल्या नैराश्यातून नितीन यांनी आत्महत्या केली आहे. पण, नितीन यांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलायला नको होते. नितीन यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे राजेसाहेब देशमुख म्हणाले.

# परळीतील लहान मुलीवर अत्याचार घटनेच्या निषेधार्थ मुस्लिम समाज आक्रमक

## फास्टट्रॅक कोर्टात चालवावा आणि लवकरच लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरात अत्याचार प्रकरणात परळीतील मुस्लिम समाज आक्रमक झाल्याचं दिसून येते आहे, आज दुपारी सकल मुस्लिम समाज परळीच्या वतीने संभाजीनगर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. या वेळी बोलताना मुफ्ती अश्फाक साहेब यांनी सांगितले आहे की हे अतिशय निंदनीय घटना आहे, जे ३ सप्टेंबरला परळी बंदचा आवाहन सामाजिक संघटना यांनी केलं आहे त्याला सकल मुस्लिम समाज परळीच्या वतीने पाठिंबा देण्यात आलं आहे.

सविस्तर माहिती अशी आहे की १) जे घटना घडली आहे त्या केसला




फास्टट्रॅक कोर्टात चालवावा आणि लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी,२) हे घटना जेव्हा समोर आली त्यावेळी त्या एका झठक्र कर्मचारी ज्याच्या नाव किशोर मनिकरणी यांनी त्या मुलीच्या आई वडीलांना सोबत अपशब्द वापरले आणि त्यांना रेल्वे स्थानकाच्या बाहेर हाकलून दिलं, असा प्रथमदर्शनी नागरिकांच्या म्हणणं आहे याची चौकशी करून त्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी आणि त्याला पण सह आरोपी करण्यात यावं ३)परळी रेल्वे पोलिसांनी यापुढे रेल्वे परिसरात आपली सुरक्षा वाढवावी आणि रेल्वे स्थानक परिसरात जे नशेडी बसत आहे त्यांच्यावर ही रेल्वे पोलिसांनी कारवाई करावी ४) शहरात अनेक ठिकाणी गुटखा,गांजा आणि अनेक अंमली पदार्थ विकणाऱ्या वर ही कारवाई करण्यात यावी, या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे यावेळी मुफ्ती अश्फाक साहेब,नजीर अहेमद सर, गफ्फार शाह,साजेद बबलु,जुबेर भाई बाबा,बदर भाई,शहेरयार सय्यद सह अनेक परळीतील राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# संत रामपाल जी महाराजांचा अवतरण दिवस भव्य सोहळ्यात साजरा होणार

माहूर/दै. महाभारत प्रतिनिधी

सतलोक आश्रम, ढवळपुरी येथे येत्या ६, ७ आणि ८ सप्टेंबर २०२५ रोजी जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांचा अवतरण दिवस सोहळा* मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या भव्य समारंभात लाखो भक्त सहभागी होऊन अध्यात्म, सेवा आणि समाजसुधारणा यांचा संगम अनुभवणार आहेत.

समारंभाच्या निमित्ताने भव्य भंडारा, दहेजमुक्त विवाह, अमर ग्रंथ साहेब पाठ तसेच रक्तदान शिबिर यांसारखे कार्यक्रम होणार असून, सामाजिक ऐक्य आणि

**कबीर, धन जननी धन भूमि धन, धन नगरी धन देश। धन करणी धन कुल धन, जहां साधु प्रवेश।**

मानवी कल्याणाचा संदेश यातून दिला जाणार आहे. विशेष म्हणजे, विवाह सोहळा पूर्णपणे खर्चमुक्त व दहेजरहित असेल.

संत रामपाल जी महाराजांचा जन्म ८ सप्टेंबर १९५१ रोजी हरियाणा राज्यातील सोनीपत जिल्ह्यातील धनाना गावात झाला होता. त्यामुळे हा दिवस दरवर्षी त्यांच्या अनुयायांकडून अवतरण दिवस* म्हणून श्रद्धेने साजरा केला जातो.

भक्तांच्या मते, संत रामपाल जी महाराज यांनी सर्व धर्मग्रंथांमधून प्रमाण देत हे स्पष्ट केले आहे की मनुष्यजन्म हा फक्त परमात्मा प्राप्तीसाठी आहे. त्यांच्या शिकवणीमुळे अनुयायांना शारीरिक, मानसिक, आर्थिक तसेच अध्यात्मिक लाभ होत असून, व्यसनमुक्ती आणि सामाजिक ऐक्याचा मार्ग मिळतो.

समारंभासाठी आश्रमात देशभरातून व परदेशातूनही मोठ्या संख्येने भक्त येण्याची शक्यता आहे. आयोजकांनी वाहतूक, निवास आणि सुरक्षा व्यवस्थेची विशेष तयारी केली असल्याचे सांगितले जाते.भक्तवर्गामध्ये या सोहळ्याबद्दल मोठी उत्सुकता असून, ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान ढवळपुरी येथे अध्यात्म आणि सेवाभावाचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळणार आहे.

# दिंडोरी शहरात बिबट्या निघाल्याची अफवा, परिसरात घबराट

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक-: दिंडोरी शहरात सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान शिवाजीनगर परिसरात बिबट्या निघाल्याचे वृत्त सर्व दिंडोरी शहर व परिसरात पसरले, परंतु वनविभागाच्या तसेच ग्रामस्थांचा अथक शोधकार्य नंतरही बिबट्या न सापडल्याने बिबट्या दिंडोरी च्या शिवाजीनगरात आल्याची शेवटी अफवाच ठरली.

दिंडोरी शहरातील शिवाजीनगर येथे सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान बिबट्या आल्याची एका युवकाने सांगितले. शिवाजीनगरातील मोठ्या पटांगणावर बिबट्याने पलायन केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी पटांगणाकडे धाव घेतली. कुणीतरी वनविभागाला फोन केला व वनविभागाचे पथक सुद्धा दाखल झाले. हळूहळू ही सर्व गर्दी पटांगणाकडे वळली. त्यानंतर वनविभागाचे वनरक्षक, वनपाल व वनविभागाचे कर्मचारी ताफ्यासह हजर झाले. बिबट्याला पकडण्यासाठी आवश्यक ते साहित्य बरोबर आणले होते. शिवा जीनगर येथे वाढलेल्या गवतात बिबट्या लपला असल्याची शक्यता गृहीत धरून शोध कार्य सुरू झाले. चार ते पाच जेसीबीच्या सहाय्याने गवत काढण्यात आले. त्याचबरोबर सर्व कर्मचाऱ्यांनी कोपरे अन कोपरे तपासले. शेवटी कुठेच काही आढळून आले नाही. अखेरीस फक्त कुत्र्यांचे पायांचे ठसे दिसून आले. त्यानंतर बातमी देणाराचा शोध घेतला पण तो सापडला नाही. शेवटी बिबट्या निघाला ही अफवाच ठरली. वनविभागाचे कर्मचारी त्यांची नियोजित सुट्टी रद्द करून कर्तव्यावर हजर झाले होते. त्यांचा दिवस व वेळ वाया गेला. कुणीही प्रत्यक्ष बिबट्या पाहिल्याशिवाय अफवा पसरवून नागरिकांना भयभीत करू नये, असे आवाहन यावेळी वनविभागाने केले आहे.





# हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी - मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज आगामी १७ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्मारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन आवश्यक कामांची तपासणी केली .

यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते .

प्रशासनाने स्मारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले .

# साई संस्थान एम्पलॉइज सोसायटीच्या गणरायाच्या आरतीसाठी कोते पाटील बांधवांची उपस्थिती

शिर्डी / संजय महाजन (दै.महाभारत)

साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटीच्या गणरायाची आरती शिर्डीतील जेष्ठ नेते बाबासाहेब कोते,गंगाभाऊ कोते,उत्तम भैय्या कोते,मधुकर कोते,निलेश दादा कोते,ताराचंद कोते,छोटे बापू उर्फ दत्ता कोते,रवींद्र कोते,सुनील कोते,किरण कोते,नितीन कोते,गणेश कोते ,सोमराज कावळे यांसह कोते पाटील परिवारातील सदस्यांच्या हस्ते मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली

संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा श्री साईबाबांची शाल देत सत्कार करण्यात आला

यावेळी शिर्डीतील कोते पाटील परिवारातील सदस्यांची तसेच साई संस्थान एम्प्लॉइज सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, व्हा चेअरमन पोपटराव कोते,सचिव विलास वाणी यांसह संचालक मंडळाची उपस्थिती होती

माजी उपनगराध्यक्ष निलेश कोते यांनी चेअरमन विठ्ठल पवार आणि संचालक मंडळाच्या सुरू असलेल्या पारदर्शक कारभाराचे विशेष कौतुक करत येत्या सप्टेंबर महिन्यात राज्यातल्या एम्प्लॉइज को ऑपरेटिव्ह सोसायटीच अधिवेशन वेळी साई संस्थान एम्प्लॉइज सोसायटीला दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याबाबत तसेच राज्यातील पाच को ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कर्तृत्ववान चेअरमन म्हणून बेस्ट चेअरमन ऑफ द एम्प्लॉइज क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून चेअरमन विठ्ठल पवार यांची निवड अतिशय योग्य असल्याचे मत व्यक्त करत अतिशय संघर्षातून विठ्ठल पवार नावाचे नेतृत्व



संस्थेच्या सभासदांना लाभल्याचे निलेश कोते तसेच छोटे बापू उर्फ दत्ता कोते संचालक राम गागरे सचिव विलासराव वाणी विजय शिंदे नवनाथ थोरे रमेश वाघे सुनील चिकणे राजेंद्र खर्डे मंगेश कुलकर्णी व पत्रकार संजय महाजन आदी कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेधडक

### ई पीक पाहणीचा फेरा..!

कद्रावदार दारववलाय पावसाने
पिकांचं अतोनात नुकसान झालं,
इतकं होऊनही सरकारनं
नियमांच्या फेऱ्यात अडकवलं.!

डिजिटल झालोय आपण असा
नेहमी करतेच न सरकार दावा ,
म्हणूनच नियम न लादता त्यांनी
तात्काळ मदतीचा आधार द्यावा..!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४